16 TO 22 NOV 2020 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 13/11/2020 9:01 PM Page 1




गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ | अंक : ४८ | सोमवार दि. १६ नोव्हेंबर २०२० ते रविवार दि. २२ नोव्हेंबर २०२० | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||






# मातीमोल झालेत यंदा आनंदाचे क्षण गरीबांच्या दिवाळीला कोरोनाचे ग्रहण



वसई/लक्ष्मणराव पाटोळे-पाटील

दीपावली म्हणजेच दिव्यांचा सण. माणसाचे आयुष्य उजळून टाकणारा वर्षभरातील दुःख आणि वेदना दोनचार दिवस का होईना विसरायला लावणारा सण. आनंद आणि उत्साह द्विगुणीत करणाऱ्या दिवाळीत गोड धोड फराळाची रेलचेल फटाक्यांची आतषबाजी आणि पाव्हण्या-रावळ्यांची उठ बस यात माणूस हरवून जात असतो. कपडे आणि दागिन्यांची खरेदी हे तर दिवाळीचे मुख्य आकर्षण असते. पण या वर्षी कोरोनाने दिवाळीच्या उत्साहावर अक्षरशः पाणी फेरले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या लॉकडाऊनमध्ये अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, बेरोजगार झालेल्या लोकांवर उपासमारीची पाळी आली आहे. घरभाडे, वीज बिल, कर्जाचे हप्ते थकलेत, कुणाकडून मदत मिळायला तयार नाही. अशा संकटाच्या काळात मित्र मंडळी, सगे सोयरे सगळ्यांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे कित्येकांनी आपल्या मुलाबाळांना ठार मारून स्वतःही आत्महत्या केलीय. अशा परीस्थित जिथे जेवायचे वांदे तिथे दिवाळी कुठून आणि कशी साजरी करणार. त्यामुळे यावर्षी गोरगरीब तसेच मध्यम वर्गीयांची दिवाळी प्रकाशमय नव्हे, तर अंधारमय झाली आहे.

ज्या झोपडपट्ट्या आणि बैठ्याचाळींमध्ये दिवाळीत आकाश कंदील लागायचे, फटाक्यांचा धुमधडाका असायचा, फुलबाज फिरवणाऱ्या लहान मुलांचा किलबिलाट असायचा तिथे आज ऐन दिवाळीत सन्नाटा आहे. कोरोनाने ज्यांच्या कुटुंबातील माणसांचा बळी घेतलाय. त्यांच्या कुटुंबात तर दुखःचा अंधार पसरला आहे. मात्र ज्यांच्याकडे पैसा आहे, त्यांची मात्र दरवर्षी प्रमाणेच दिवाळी जोरात आहे. खरेदीसाठी त्यांची मार्केटमध्ये गर्दी उसळली आहे. पण बहुसंख्य लोकं मात्र अंधारात आहेत. त्यामुळे सामान्य माणसासाठी यंदाची दिवाळी काळी दिवाळी ठरली आहे. एकीकडे महागाई आहे, तर दुसरीकडे कोरोनाचे संकट आहे. अनलॉक प्रक्रीयेअंतर्गत गेल्या दोन महिन्यांपासून काही कारखाने खाजगी कार्यालये दुकाने उघडली आहेत. पण आता दुकानदारांनी सुद्धा गेल्या आठ महिन्यातील बंद ...पान २ वर

## विश्वासघाताचा घाव जिव्हारी बसला पण प्रियकराच्या हत्येचा कट फसला



मुंबई/क्राईम रिपोर्टर

**प्रियकर आणि प्रेयसी यांच्या प्रेमाला बहर येत असताना जर माजामौज करून प्रियकराने प्रेयसीकडे पाठ फिरवली तर ती अक्षरशः नागीण बनून सूड घेण्यासाठी पेटून उठते. बँक अधिकारी असलेल्या एका महिलेचा प्रियकराने असाच विश्वासघात करताच ती पेटून उठली आणि तिने सरळ प्रियकराच्या हत्येची सुपारी दिली. मात्र एक लाखांची सुपारी घेऊन हत्या करायला आलेला हा तो कॉन्ट्रेक्ट किलर पोलिसांच्या जाळ्यात सापडला आणि हत्येचा कट उधळला गेला.**

माटुंगा पोलिसांनी एका नामांकित बँकेच्या असिस्टंट मॅनेजरला आपल्या प्रियकराची सुपारी देताना अटक केली आहे. गुन्हा घडल्यानंतर पोलीस येतात.असा अनेकदा पोलीसांवर ...पान २ वर

## दोघांमधील आर्थिक वाद मिटण्याऐवजी फसला मध्यस्थी करायला गेलेला जीव गमावून बसला



मयत विनायक हुक्केरी

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

**आर्थिक व्यवहारात मध्यस्थी करणे कधीही धोकादायक असते. कारण असे वाद अगोदरच दोन्हीकडून चिघळलेले असतात अशा स्थितीत कुणा एकाच्या बाजूने जो मध्यस्ती करायला जातो त्याच्यावरच समोरच्या पार्टीचा अधिक राग असतो. अशावेळी मग ज्यांच्यात वाद असतो ते बाजूलाच राहतात आणि मध्यस्थी करायला गेलेल्याचा जीव जातो. इचलकरंजी येथेही तसेच घडले. नगरसेविकेचा पती असलेलेला एक शहरातील नामचीन माणूस आपल्या मित्राच्या आर्थिक व्यवहारात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करीत होता. पण वाद काही मिटला नाही. उलट त्यालाच यात जीव गमवावा लागला. या प्रकरणी आरोपी असलेल्या तेली बांधून पोलसांनी अटक केली आहे.**



इचलकरंजी शहरातील भोने माळ, आणि जवाहरनगर परिसर तसा संवेदनशिल भाग म्हणून ओळखला जातो. या भागात कायम काही ना काही भानगडी वाद विवाद हा दोन गटात होत असतो. जवाहरनगर, नॅशनल हायस्कुल परिसरात विनायक हुक्केरी याचा चांगलाच दबदबा होता. राजकीय नेतेमंडळीत त्यांची नेहमी उठबस होत असल्याने माजी आमदार सुरेश हाळवणकर यांच्याशी त्याची घनिष्ट संबंध होते. विनायक हुक्केरी हे जवाहरनगर परिसरात 'सुर्या'नावाने जीमचा व्यवसाय करत होते. तसेच याच नावाने त्याचा हॉटेलचा व्यवसाय ही होता. त्यामुळे त्याचा भागातील लोकांशी जास्त जास्त सपर्क येत होता. त्यातूनच त्यांची राजकारणातील उठबस होत असल्याने नगरपालिकेच्या निवडणूकीत त्यांनी आपली पत्नी नेहा यांना भाजपच्या तिकिटावर नॅशनल हायस्कुल परिसरातून निवडून आणले होते. त्या इचलकरंजी नगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका म्हणून सध्या काम करीत आहेत. पत्नी ...पान २ वर







16 TO 22 NOV 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 13/11/2020 9:08 PM Page 1



# मनस्ताप त्याचा सहन नाही झाला; दारुड्या मित्राचा मित्रांनीच खून केला

जळगाव/क्राईम रिपोर्टर

**दारूचे व्यसन असलेला माणूस केवळ त्याच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर मित्रांसाठीही डोकेदुःखी ठरलेला असतो. कारण दारूच्या नशेत मित्रानाही तो शिवीगाळ करीत असतो. त्यांच्याकडे दारूसाठी पैसे मागत असतो. नाय दिले तर मित्रांना शिव्या घालून मारायला उठतो. त्यामुळे मित्रही अशा दारुड्याला वैतागलेले असतात. जळगावमध्ये अशाच एका घटनेत दारू पिऊन शिवीगाळ करणाऱ्या दारुड्याला त्याच्या मित्रांनीच ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**




आरोपी


मयत

अतूल ज्ञानेश्वर काटकर, प्रतिक निंबाळकर, दुर्गेश आत्माराम सन्यासी आणि भुषण भरत सोनवणे हे चौघे गुन्हेगारी वृत्तीचे तरुण एकमेकांचे मित्र होते. चौघांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. दुर्गेश सन्यासी याने काही दिवसांपूर्वी जळगाव शहरातून जाणाऱ्या महामार्गावर रस्तालुट केली होती. या रस्तालुटीच्या गुन्ह्यात दुर्गेशने एका ट्रक चालकाकडून पैसे हिसकावले होते. या गुन्ह्यात अटकेनंतर तो जामीनावर बाहेर आला. प्राणघातक हल्ला करण्यासह जबरी लुटीचे गुन्हे या चौघा तरुणांवर दाखल आहेत. चौघे तरुण गुन्हेगारी वृत्तीचे असल्यामुळे साहजिकच त्यांना दारु पिण्याचे व्यसन होते. भुषण सोनवणे यास दारुचे भारी व्यसन होते. दारुचे व्यसन पुर्ण करण्यासाठी तो वेळप्रसंगी इतर तिघा मित्रांकडून बळजबरी पैशांची मागणी करत असे. वेळप्रसंगी तो मित्रांच्या खिशातून बळजबरी पैसे काढून घेत असे. त्याच्या या प्रकाराचा अतुल, प्रतिक व दुर्गेश या तिघा मित्रांना राग येत असे. त्यातून त्यांच्यात बाचाबाची होत असे. चौघे जण दारु पिण्यास बसले म्हणजे त्यांच्यात हमखास एखाद्या मुद्द्यावर वाद होत असे. या वादात भुषण एका बाजूला व तिघे दुस-या बाजुला असे दोन गट पडत असत. दोन्ही गट एकमेकांना शिवीगाळ करत असत. भुषण सोनवणे याच्या गुन्हेगारी कारवाया पोलिस प्रशासनाने हेरल्या होत्या. त्यामुळे त्याच्या हद्दपारीचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु झाल्या होत्या. भुषण सोनवणे हा कानळदा रस्त्यावर त्याच्या आई, भाऊ आणि आजीसह रहात होता. बांधकामावर स्लॅब टाकण्याकामी कॉंक्रीट तयार करणारी मिक्सर मशीन त्यांच्याकडे होती. त्या मशीनवर सोनवणे परिवाराचा उदरनिर्वाह चालत होता. ८ नोव्हेंबर रोजी रविवारचा सुटीचा दिवस होता. या दिवशी भुषण याने त्याच्या तिघा मित्रांकडे दारुची मागणी केली होती. त्याची मागणी अमान्य झाली म्हणजे तिघा मित्रांना त्याच्याकडून शिवीगाळ करण्याचा प्रकार ठरलेला असे. त्याच्या फाटक्या तोंडाला त्याचे तिघे मित्र वैतागले होते. त्यामुळे त्याचा कायमचा काटा काढण्याचा विचार अतुल, प्रतिक व दुर्गेश या तिघा मित्रांनी ठरवले होते. सायंकाळी भुषण याने त्याच्या आईला म्हटले की मला हद्दपारीची नोटीस आली असून त्याकामी वकीलाकडे जायचे आहे. वकीलाची फी देण्याकामी त्याने त्याच्या आईकडून दोनशे रुपयांची मागणी केली. त्याच्या आईने तिच्याजवळ असलेले दिडशे रुपये त्याला दिले. खिशात दिडशे रुपये पडताच भुषण घरातून बाहेर पडला तो पुन्हा घरी न येण्यासाठीच.

काही वेळातच सायंकाळ झाली व अंधार वाढत गेला. दरम्यान तिघा मित्रांनी त्याचा काटा काढण्याचे नियोजन केले होते. त्यांनी त्याला दारु पिण्यासाठी रात्री आमंत्रण दिले. दारु पिण्याचे आमंत्रण मिळताच त्याची कळी खुलली. इंद्रप्रस्थ नगर भागातील खडके चाळ रस्त्यालगत अंडाभुर्जी गाडीच्या शेजारी बसून चौघा मित्रांनी कमी खर्चात आपला मद्यपानाचा कार्यक्रम सुरु केला. रात्रीच्या अंधारात चौघांचा मद्यपानाचा कार्यक्रम हळूहळू रंगात आला होता. दरम्यान दारुची नशा भुषणच्या अंगात येण्यास वेळ लागला नाही. दारुच्या नशेत झिंगलेल्या भुषणने अतुल यास जोरजोरात शिवीगाळ सुरु केली. त्यामुळे चिडलेल्या अतुलने देखील भुषण यास शिवीगाळ सुरु केली. प्रतिउत्तर म्हणून भुषणने अतुल यास त्याच्या स्टाईलमधे आई बहिणीवरुन शिवीगाळ सुरु केली. आज भुषणचा गेम करायचा हे तिघे मित्र मनाशी ठरवून तयारीनिशीच आले होते. वादाचे स्वरुप तिव्र होताच झिंगलेल्या भुषणने अतुलच्या कानशिलात लगावून दिली. कानशिलात बसताच अतुलच्या नजरेसमोर रात्रीच्या वेळी काजवे चमकू लागले. आता भुषण विरुद्ध तिघे अशी रणभूमी तयार झाली होती. अतुलच्या कानशिलात बसताच प्रतिकने भुषणवर चाकूचे घाव करण्यास सुरु केले. आता भुषणला बघूनच घ्यायचे असे तिघांनी मनाशी पक्के ठरवले होते.

भुषणवर चाकूचे घाव प्रतिककडून होत असतांना चिडलेल्या अतुलने त्याच्या हातातून चाकू हिसकावून घेत आपल्या हाती घेतला. आता अतुलने भुषणवर चाकूचे सपासप वार करण्यास सुरुवात केली. अतुलने चाकू घेतल्यामुळे प्रतिकने आता दगडाचे घाव भुषणवर करण्यास सुरुवात केली. काही वेळात दुर्गेशने अतुलच्या हातातून चाकू घेतला. आता दुर्गेशने भुषणवर चाकूचे घाव करण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे तिघांनी आळीपाळीने भुषणवर चाकूचे घाव घातल्यामुळे भुषण याने दम तोडला. दरम्यान रात्रीचे दहा वाजून गेले तरी भुषण घरी परत का आला नाही? म्हणून त्याची आई चिंताग्रस्त झाली होती. त्यावेळी काही तरुणांनी तिला या घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच भुषणची आई धावत घटनास्थळी दाखल झाली. त्यावेळी हल्लेखोर तिघे जण भुषणवर चाकूचे घाव घालत मारहाण करतच होते. आपल्या मुलाला होत असलेली मारहाण बघून तिने जोरजोरात ओरडण्यास सुरुवात केली. आता जास्त वेळ थांबणे चुकीचे ठरेल हे लक्षात घेत तिघांनी तेथून पलायन केले. भुषणने प्राण सोडले होते. त्याचा मृतदेह बघून त्याची आई तेथेच धाय मोकलून रडू लागली. या कालावधीत बघ्यांची गर्दी जमली होती. या घटनेची माहिती मिळताच जळगाव शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक धनंजय येरुळे व त्यांचे सहकारी सहायक फौजदार वासुदेव सोनवणे, संजय भांडारकर, तेजस मराठे, योगेश इंधाटे, प्रणेश ठाकूर, भास्कर ठाकरे, गजानन बडगुजर, रतन गिते, ओम पांचलिंग, नासीर शेख, किशोर निकुंभ व राजकुमार चव्हाण असे सर्वजण घटनास्थळी दाखल झाले.

रस्त्यावर निपचीप पडलेल्या भुषण यास देवकर हॉस्पीटल येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्यास मयत घोषीत केले. त्यामुळे त्याची उत्तरीय तपासणी करण्याकामी त्याला सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी मयत भुषणची आई तिरोना भरत सोनवणे हिने दिलेल्या फिर्यादीनुसार जळगाव शहर पोलिस स्टेशनला अतूल ज्ञानेश्वर काटकर, प्रतिक निंबाळकर, दुर्गेश आत्माराम सन्यासी या तिघा तरुणांविरुद्ध खूनाचा रितसर गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळावरुन पळून गेलेल्या तिघा हल्लेखोर तरुणांना ताब्यात घेण्याकामी पथके रवाना करण्यात आली. दरम्यान शहर पोलिस स्टेशनचे कर्मचारी तेजस मराठे व योगेश इंधाटे यांना अतुल काटकर व प्रतिक निंबाळकर यांचे लोकेशन खबऱ्याकडून समजले. माहीती समजताच तेजस मराठे व योगेश इंधाटे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सापळा रचून अतुल काटकर यास त्याच्या राहत्या घरातून व प्रतिक निंबाळकर यास बहिणाबाई उद्यान परिसरातून ताब्यात घेत अटक केली. स्थानिक गुन्हे शाखेचे विजयसिंग पाटील, जितेंद्र पाटील, प्रीतम पाटील, नितीन बाविस्कर यांनी दुर्गेश सन्यासी याला शाहू नगर परिसरातून अटक केली. तिघा हल्लेखोर संशयीतांना पो.नि. धनंजय येरुळे यांच्या समोर हजर करण्यात आले. त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. तिघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना सुरुवातीला पाच दिवस पोलिस कोठडी सुनावली.

अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी यांच्या निर्देशाखाली पोलिस निरीक्षक धनंजय येरुळे व त्यांचे सहकारी वासुदेव सोनवणे, विजय निकुंभ, गणेश पाटील, प्रणेश ठाकूर, भास्कर ठाकरे, गजानन बडगुजर, रतन गिते, ओम पंचलिंग, नासीर शेख, व राजकुमार चव्हाण यांनी तपासकामी परिश्रम घेतले.

पान १ वरून....

## मातीमोल झालेत यंदा आनंदाचे ...

काळातले नुकसान भरून काढण्यासाठी मालाचे भाव भरमसाठ वाढले आहेत. त्यामुळे धान्य असो कि इतर वस्तू असोत, विकत घेणे परवडणारे नाही आणि ज्यांच्याकडे पैसाच नाही असे लोकं कुठून आणि कशी खरेदी करणार मुंबई सारख्या शहरापुरते बोलायचे झाल्यास तिथल्या ५००हून अधिक प्रतिबंधित क्षेत्र होती. त्यात सलग पाच ते सहा महिने लॉकडाऊन होता. यात वरळी कोळीवाडा, धारावी आणि अन्टोप हिल सारख्या मोठ्या झोपडपट्ट्याचा समावेश आहे आणि इथल्या लाखो कुटुंबातील लोकं काम धंदा गेल्याने बेरोजगार झाले होते. त्यांना सुरवातीच्या काळात सरकार आणि सामाजिक संस्थांकडून मदत मिळाली. पण नंतर मात्र सगळ्यांनी पाठ फिरवली. या पैकी काही लोकांचे काम धंदे सुरु झालेत. पण अजून त्यांचा आर्थिक गाढा रुळावर आलेला नाही. अशा लोकांकडे आज पुरेसा पैसा नाही. त्यामुळे ते दिवाळी साजरी केरू शकत नाहीत. तसेच एकट्या मुंबईत जवळपास जवळपास १७ लाख कोरोना बाधित असून त्यातील ४५ हजार लोकांचा मृत्यू झालाय. ज्यांच्या घरातल्या माणसाला कोरोना झालाय त्यांचे उपचारावर लाखो रुपये खर्च झालेत. काहींना दागदागिने, घरदार विकावे लागले. त्यामुळे आज झोपडपट्टी आणि चाळीत राहणारा माणूस कंगाल आणि कर्जबाजारी झालेला आहे. त्यामुळे त्याच्यासाठी हि दिवाळी काळी आणि अंधकारमय आहे. वास्तविक सरकारने अशा संकट काळात मदत करायला हवी. किमान झोपडपट्टीत किंवा चाळींमध्ये जाऊन फराळ किंवा मुलांसाठी छोट्या फटक्याचे तरी वाटप करायला हवे होते. पण सरकारने पाठ फिरवली. त्यामुळे कंपनीत, दुकानात काम करणारा सामान्य माणूस फेरीवाले स्टेशनवरचे हमाल हा सगळा गरीब वर्ग आज दिवाळीत अंधारात बसून उद्याची चिंता करीत आहे.

## दोघांमधील आर्थिक वाद मिटण्याऐवजी ....

नगरसेविका असल्याने खरा कारभार हा विनायक हुक्केरी याच्या हातातच होता. ते भागातील लोकांच्या अडीअडचणीला धावून जात त्याची कामे मार्गी लावत होते. एक कुशल आणि यशस्वी व्यावसायिक व नगरसेविकाचा पती म्हणून त्याचा त्या भागात वट होता. कोणाच्या ही अर्थिक व्यवहारात ते मध्यस्थ म्हणून काम करीत होते. त्यात त्यांचा ही फायदा होत होता. ते जीमच्या व्यवसायात असल्याने त्यांचा सपर्क ही मोठा होता. एकादया अर्थिक व्यवहारात मोठा ढपला पाडल्या शिवाय कोणतेही गणित बसत नाही हे विनायक हुक्केरी ओळखून होते.त्यामुळे ते त्या व्यवहारात आपला फायदा बघूनच काम करीत होते. आपल्या राजकीय वर्चस्वाच्या जोरावर ते समोरच्याला माघार घ्यायाला लावत होते. त्याच्या शब्दाला तसा मान होता. त्यामुळे त्याना भागात 'दादा'म्हणूनच ओळखत होते. अर्थिक व्यवहार हा कधी ही कोणाबरोबर जपूनच करावा लागतो. त्यात ही मध्यस्थी करताना दहादा विचार केलेले बरा.राजकारणात आणि व्यवहारात शेराला सव्वा शेर भेटत असतात.

अगदी तसाच विनायक हुक्केरी याच्याबाबत झाले. एका अर्थिक व्यवहारात ते आपल्या मित्राबरोबर मध्यस्थी करीत असताना ते प्रकरण त्याच्या जीवावरच बेतले होते. शनिवार दि.७ नोव्हेबंर २०२०रोजी रात्री ते आपल्या मित्रासमवेत कबनूर येथील कोल्हापूर इचलकरंजी रोडवरील हॉटेल रविराज येथे पार्टीसाठी गेले होते. त्यावेळी तेथे त्यांची पार्टी चालू असताना दोघा तिघांनी खूनी हल्ला केला होता. त्यात त्याच्या पोटावर, छातीवर चाकूने वर्मी घाव बसल्याने ते गंभीररित्या जखमी झाले होते. त्याना उपचारासाठी दाखल केले असता त्याचा सोमवार दि.९ नोव्हेंबर रोजी मृत्यु झाला होता. सुरूवातील भाजपच्या नगरसेविकेच्या पतीवर खूनी हल्ल्याने संर्पूण इचलकरंजी शहर हादरले होते. या घटनेची माहिती शिवाजी नगर पोलीसांना समजताच घटनास्थळी पोलीस दाखल झाले होते. त्यांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी सह इतर दोघांना ताब्यात घेतले होते.

हुक्केरी परिवार तसा इचलकरंजीतील मोठा सधन परिवार म्हणून ओळखला जातो. गेल्या बारा तेरा वर्षापूर्वी त्याचा विवाह नेहा बरोबर झाला होता. त्याना एक दहा वर्षाचा मुलगा एक मुलगी आहे. राजकारणात काम करण्याच्या इच्छेनेच त्यांनी भाजपची साथ संगत केली होती. त्यातच जीमचा आणि हॉटेलचा व्यवसाय असल्याने त्यातूनच त्यांनी आपल्या प्रभागात तरूण मित्रांचे गट तयार करून त्यांना कामाला लावले होते. माजी आमदार सुरेश हाळवणकर जवाहरनगर परिसरातून भाजपाचे पाठबळ दिले होते. त्यामुळे ते भागातील कोणाच्या ही कोणत्याही अडचणीला ते धावून जात असल्याने विनायक हुक्केरी यांनी आपल्या राजकीय इच्छा शक्तीच्या जोरावर गेल्या नगरपालिकेच्या निवडणूकीत पत्नी नेहा हिला भाजपाच्या तिकिटावर निवडून आणले.त्यानंतर ते आपले राजकीय वजन वापरून काम करीत होते.इचलकरंजी नगरपालिकेत नगरसेविका म्हणून महिला निवडून आल्या तरी खरा कारभार हा त्यांच्या नावाने त्याचे पती पाहत असतात ही खरी वस्तुस्थिती आहे.त्यामुळे एखाद्या अर्थिक व्यवहारात विनायक हेच पुढे पुढे करत होते. इचलकरंजी नगरपालिकेत आपल्या जवळच्या व्यक्तींना आणि सग्या सोयऱ्यांना एखाद्या मोठया कामाचे कंत्राट नगरसेविका मार्फत मिळवून दिले जाते. त्यात त्यांचे कमिशन ठरलेले असते. त्यामुळे एखाद्या कामात मोठा ढपला पाडयचा असेल तर बऱ्याच वेळा या आर्थिक व्यवहारातून वाद विवाद ही होत असतात.

शहापूर येथील बसवराज तेली याने सद्दाम फकिर याच्याबरोबर एक व्यवहार केलेला होता.त्या व्यवहारातून त्या दोघांची मोठी भांडणे ही झालेली होती. सद्दाम फकिर हा जवाहरनगर परिसरात नॅशनल हायस्कुल येथे राहत होता.सद्दाम याचा भाऊ जियाउद्दीन हा विनायक हुक्केरी याचा जवळचा मित्र होता. जियाउद्दीन याने विनायक यांना सद्दामचा बसवराज तेली यांच्या बरोबर झालेला अर्थिक व्यवहार मिटविण्यास सांगितले होते. त्यामुळे विनायक यांनी हा व्यवहार मिटविण्यासाठी पुढाकार घेऊन प्रयत्न केले होते. परंतु तो व्यवहार काही केल्या मिटलेला नव्हता. त्यातून विनायक याचे देखिल बसवराज याच्याबरोबर खटके उडालेले होते. त्याच्यात ही तू तू मै.मै झालेली होती. त्यामुळे बसवराज हा सद्दाम याच्याबरोबरच विनायक याच्यावर देखिल चिडून होता. मागे एकदा भांडणात विनायक मध्यस्थी करायला गेले असताना विनायक याने बसवराजला या तुला व्यवहार मिटवून घ्यायचा नसेल तर तु कोणाककडून यायचे ते ये.मी बघून घेतो. माझ्या माणसाच्या केसाला जरी धक्का लागला तरी तुला सोडत नाही असे धमकावले होते. त्या व्यवहारात बसवराज याचे फार मोठे नुकसान होणार होते. तो व्यवहार हा जमीन खरेदी व्रिकींचा होता. त्यामुळे ती जमीन बसवराज याच्या ताब्यात जावून त्याचे अर्थिक नुकसान होणार होते. काही केल्या सद्दाम फकीर, जियाउद्दीन फकीर, हे हा व्यवहार मिटवून घ्यायला तयार नव्हते. त्यातच त्यांनी विनायक हुक्केरी यांना मध्यस्थी करायला लावल्याने तो व्यवहार ताणतच जात होता. बसवराज तेली आणि त्याचा भाऊ अशोक तेली, सुभाष तेली हे बऱ्याच वेळेला विनायक यांच्याकडे जावून हा व्यवहार मिटवून घ्या असे सांगत होते. पण काही केल्या हा व्यवहारच मिटत नव्हता.

विनायक हे नेहमी आपल्या मित्रांच्या समवेत दारूच्या आणि जेवणाच्या पार्टीला वेगवेगळ्या हॉटेलात जात होते. टेबललाच एखादा व्यवहार ते मिटवत होते. याची कुणकुण तेली भावांना लागलेली होती. ते नेहमी कबनूर जवळील हॉटेल रविराज येथे दारू पिण्यासाठी आणि जेवणासाठी जात असल्याची माहिती तेली बंधुना लागलेली होती. हा व्यवहार जर मिटवयाचा असेल तर या व्यवहारातून विनायक हुक्केरी याला बाजूला काढले पाहिजे. सद्दाम आणि त्याचा भाऊ जियाउद्दीने हे दोघे त्याच्याच जीवावर उडया मारत आहेत हे तेली बंधुंनी ओळखले होते. म्हणून त्यांनी विनायक यानाच बाजुला करायचे ठरविले होते. ते त्याच्या पाळतीवरच होते. शनिवार रात्री ९वाजणेच्या सुमारास विनायक हे जियाउद्दीन आणि आपल्या इतर मित्रांच्या बरोबर हॉटेल रविराज येथे पार्टीला गेले होते. त्यांची ड्रिंकची पार्टी रंगात येत असताना त्यांनी जेवणाची ही ऑर्डर दिलेली होती. पेग वर पेग रिचत होते. सगळ्यांना नशा झालेली होती. एवढयात त्या हॉटेलमधील गार्डन मध्ये दुसऱ्या बाजुला दबा धरून बसलेले तेली बंधुंनी डाव साधला. अचानक ते उठून येऊन जियाउद्दीनच्या समोर राहिले. त्यावेळी समोरच विनायक ही होता. तेली बंधूनी आपल्याकडील चाकू काढून विनायक याच्या छातीवर, पोटावर वार करायला सुरूवात केली. सगळीकडे पळापळ सुरू झाली. वेटरला, मॅनेजरला काय झाले हे समजेनासे झाले. आपला जीव वाचविण्यासाठी गार्डनमधून विनायक पळत बाहेर येत असताना तेली बंधूनी त्याला खाली आडवे पाडून त्याचेवर परत सहा ते सात सपासप वार केले. सगळीकडे गोंधळ उडला असताना हॉटेलच्या बाहेर लावलेल्या दुचाकींवरून तेली बंधू त्याचेवर वार करून पळून ही गेले. इकडे विनायकच्या बरोबर असणारे मित्र ही बाहेर पळाले होते. संशयीत मारेकरी विनायकवर खूनी हल्ला करून पळून गेल्यावर जखमी विनायकला त्याच्या मित्रांनी शहरातील एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. परंतु त्याच्या पोटातून मोठा रक्तस्त्राव झाल्याने व त्याची नाजूक गंभीर परिस्थीत असल्याने तेथील डॉक्टरांनी त्याला सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे नेण्यास सांगितले. त्यानुसार त्याला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. परंतु त्यांची उपचारा दरम्यान गंभीर अवस्था बनत चालली होती.

इकडे या घटनेची माहिती शिवाची नगर पोलीसाना समजताच शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रकाश निकम, ईश्वर ओमासे यांनी आपल्या सहकाऱ्यासह भेट देवून घटनेचा पंचनामा करून माहिती घेतली होती.या घटनेतील संशयीत आरोपी पळून गेले होते. दरम्यान घटना कोणत्या कारणातून घडली. आणि यातील संशयीत कोण आहेत याची माहिती पोलीसांना मिळाली होती.पोलीसांनी या घटनेनंतर अवघ्या काही तासातच पळून गेलेल्या बसवराज तेली. अशोक तेली आणि सुभाष तेली याच्या मुसक्या शहापुर परिसातून आवळ्या होत्या. पोलीसांनी त्याना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. दरम्यान या घटनेत गंभीर जखमी झालेले विनायक हुक्केरी याचा सोमवारी उपचारादरम्यान सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मृत्यु झाला. ही बातमी शहरात समजताच हुक्केरी यांच्या परिवारात आणि समर्थकांत दुःखाची छाया पसरली. दुपारनंतर शवविच्छेदनानंतर त्याचा मृतदेह नॅशनल हायस्कूल जवाहरनगर येथील त्याच्या निवासस्थांनी आणण्यात आला होता. त्यावेळी त्याच्या समर्थकांनी एकच गर्दी केली होती. अंत्यत शोकाकूल वातावरणात त्याचेवर पंचगंगा स्माशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांची पत्नी नगरसेविका नेहा, मुलगा पार्श्व आणि त्याच्या कुटुंबियांनी केलेला अक्रोश हृदय पिटाळून टाकणारा होता. यावेळी शहरातील माजी आमदार, सुरेशराव हाळवणकर यांचेसह नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, आजी माजी नगरसेविक व इतर मान्यवर उपस्थित होते. या घटनेची फिर्यादरविराज हॉटेलच्या व्यस्थापकांनी शिवाजीनगर पोलीसात दिली होती. पोलीसांनी विनायक सुरेंद्र हुकेरी (वय ४०) याच्या खून प्रकरणी बसवराज महादेव तेली, अशोक तमान्न तेली, सुभाष तमान्न तेली रा. तिघेही शहापूर इचलकरंजी यांचे विरोधात गुन्हा रजि.नं ५९/२०२० भा.दं.वी.कलम ३०२, ३०७,३२३,५०४,३४ नुसार गुन्हा दाखल करून त्यांना मा. इचलकरंजी येथील कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांना १५ नोव्हेंबर २०२० पर्यंतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेल्या मोटार सायकली आणि चाकु जप्त केला. या घटनेचा पुढील तपास शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ईश्वर ओमासे हे करत आहेत. कधी ही कोणता ही अर्थिक व्यवहार हा जपूनच करावा लागतो. त्यातच मध्यस्थी ही जपूनच करावी लागते नाहीतर हीच मध्यस्थी अंगलट येण्याची ही शक्यता असते. हेच या घटनेवरून दिसून येते.

## विश्वासघाताचा घाव जिव्हारी बसला...

आरोप केला जातो. परंतु याच पोलीसांच्या सतर्कतेमुळे मुंबई महानगरपालिकेत सब इंजिनिअर असलेल्या अधिकारीचा जीव वाचला. पोलीसांनी हि खबर मिळाली नसती तर या अधिकार्याचा मुडदा पडला असता. यंदाच्या दिवाळीत त्या अधिकार्याच्या घरी स्मशान शांतता पसरली असती. पण या अधिकार्याचे नशिब बल्वतर म्हणून त्याचा जीव वाचला. या अधिकार्याच्या हत्येसाठी सुपारी किलर आला आहे अशी माहिती माटुंगा पोलीसांना मिळताच पोलीसांनी तातडीने हालचाल करून या अधिकार्याच्या हत्येचा कट उधळून लावला. विशेष म्हणजे या सब इंजिनिअरच्या हत्येची सुपारी देणारी एका नामांकीत बॅंकेची असिस्टंन मॅनेजर आहे. पोलीसांनी या महिलेला आणि कॉन्टेक किलरला नुकतीच अटक केली आहे. यात एकून तीन आरोपी पोलीस कोठडीत पोहोचले आहेत.

माटुंगा पोलिसांनी एका नामांकित बॅंकेच्या असिस्टंट मॅनेजरला आपल्या प्रियकराची सुपारी देताना अटक केली आहे. अटक केलेल्या महिलेचा प्रियकर मुंबई महानगरपालिकेच्या एका वॉर्ड ऑफिसमध्ये सब इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे. पोलिसांनी जर ही अटक केली नसती तर सब इंजिनीयरची आत्तापर्यत हत्या झाली असती. विशेष म्हणजे तिघेही उच्चशिक्षित आहेत. आरोपी महिला मुंबईच्या नामवंत बॅंकेमध्ये गेल्या चार वर्षापासून असिस्टंट मॅनेजर आहे. ज्याला सुपारी दिली तो केमिस्ट्रीमध्ये बीएससी आहे तर ज्याला मारणार होते तो मुंबई महानगरपालिकेमध्ये सब इंजिनियर आहे.

एका घटनेमुळे हे दोघे एकत्र आले होते. यातून या दोघांची ओळख वाढत गेली.छोटे-मोठे कारण पुढे करून हे दोघे फोनवर तासनतास गप्पा मारत होते. या दोघांमध्ये प्रेमाचा उंकूर कधी फुटला हे या दोघांना कळले नाही.पुढे दोघेही एकमेकांना भेटू लागले. आपला एकमेकांसाठीच जन्म झाला आहे असे या दोघांना वाटू लागले होते. पूढे मॅनेजर आणि सब इंजिनियर या दोघांमध्ये प्रेमसंबंध वाढत गेले होते, बॅंक मॅनेजर महिला सब इंजिनिअरच्या प्रेमात आखंड बुडाली होती.या दोघांचाही लग्न झालं होतं. लग्नानंतर सुद्धा इंजिनियरने आपल्याशी प्रेम संबंध ठेवावा म्हणून ही मॅनेजर त्याच्या पाठीमागे तकादा लावत होती. सुरवातीला काही दिवस असेच गेले. सब इंजिनिअरने तिची समजूत काढली. आता माझे लग्न झाले आहे. त्यामुळे मी तुला वेळ देऊ शकत नाही. आपण हे संबंध आता इथेच संपवून टाकू. परंतु ती ऐकायला तयार नव्हती. अखेर तिला कंटाळून या इंजिनिअरने बॅंक मॅनेजरला ब्लॉक केलं आणि सगळे संपर्क बंद करून टाकले. तिच्या अंगाचा तिळपापड ऊडाला होता.अचानक त्याच्यात हा बदल झाल्याने

मॅनेजरला याचा प्रचंड राग आला. मला सोडून हा कसा जगतो हे मी पाहते.असे म्हणत तिने सब इंजिनिअरच्या हत्येचा कट रचला.यासाठी तिने ओरीसा मधून एका कॉन्ट्रॅक्ट किलरला एक लाख रुपयांमध्ये इंजिनीअरची हत्या करण्यासाठी सुपारी दिली. ओरिसाचा हा किलर रविवारी दादर रेल्वे स्टेशन येथे आला होता. पोलीसांना याची खबर आधीच मिळाली होती पोलीसांनी या ठिकाणी सापळा रचला होता. पोलीस बॅंक मॅनेजर आणि कॉन्टेक किलरवर वॉच ठेऊन होते. जिथे ती मॅनेजर त्याला सब इंजिनियरची हत्या करण्यासाठी बंदूक आणि पाच गोळ्या देणार होती. मात्र माटुंगा पोलीसांनी वेळेत दोघांनाही ताब्यात घेतले त्याच्या चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्या नंतर त्यांना अटक करण्यात आली. मॅनेजर आणि सब इंजिनियर दोघांचही वेगवेगळ्या ठिकाणी लग्न झालं होतं. मात्र लग्नानंतर ही दोघं एकमेकांच्या संपर्कात आले आणि त्यांच्यात प्रेम संबंध निर्माण झाले. काही दिवसानंतर सब इंजिनीयरला हे नातं कायम ठेवणं जड जाऊ लागलं ज्यामुळे त्याने हे नातं तोडण्याचा निर्णय घेतला. मात्र महिला मॅनेजरने यासाठी नकार दिला आणि हे नातं सुरू ठेवण्यास तगादा लावला. पण इंजिनियर आपल्या निर्णयावर ठाम होता आणि याचाच राग आणि विचार सतत त्या महिला मॅनेजरच्या मनात होता. या दोघांमध्ये असं काय झालं की ही महिला हत्या करण्याच्या टोकापर्यत पोहोचली ? महिला मॅनेजरने नेमका त्या किलरशी कसा आणि कोणाच्या माध्यमातून संपर्क केला? तसेच बंदुक आणि गोळ्या महिला मॅनेजरला कोणी आणि कुठून आणून दिले याचा तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस उपायुक्त विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक पोलिस आयुक्त भीमराव इंदलकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय सिंह घाटगे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक भरत गुरव, पोलीस नाईक पाल, पवार, मुंडे, मोरे, पोलीस शिपाई जरड, शेलारआणि महिला पोलीस शिपाई परब आणि मोसमकर या पथकाकडून करण्यात आली.







## महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या दिपावलीनिमित्त शुभेच्छा!

**मुंबई/प्रतिनिधी**

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी राज्यातील जनतेला दिपावली निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. यंदाची दिवाळी आपण सर्वांनी उत्साहात, आनंदात साजरी करूया. कोविडचा धोका अजूनही टळलेला नसल्याने प्रतिबंधक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन थोरात यांनी केले आहे. दीपावलीचा आनंद लुटत असताना सर्वांनीच केंद्र आणि राज्य शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून आनंदासह आरोग्य आणि सुरक्षितता जपण्याचे आवाहनही श्री. थोरात यांनी केले आहे. संपूर्ण जगावर, देशावर आणि राज्यावरचे कोविड-१९ चे संकट अजूनही टळलेले नाही. त्यामुळे सध्याची परिस्थिती पाहता आपण या वर्षीची दिपावली प्रदूषणमुक्त साजरी करावी, असे आवाहनही थोरात यांनी केले आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून दिवाळीच्या शुभेच्छा!

**मुंबई/प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या असून ही दिवाळी सर्वांच्या जीवनात आनंद, उत्साह, समृद्धी, उत्तम आरोग्य घेऊन येवो, अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत. यंदाची दिवाळी सर्वांनी कोरोनाप्रतिबंधक नियमांचं काटेकोर पालन करुन साजरी करुया, आसपासच्या गरीब, दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांना मदत करुन त्यांनाही दिवाळी आनंदात सहभागी करुन घेण्याची परंपरा यावर्षीही कायम राखूया, असं आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार दिवाळीच्या शुभेच्छा संदेशात म्हणतात की, दिवाळी हा दिव्यांच्या रोषणाईचा, प्रकाशाचा सण आहे. दिवाळीनिमित्त घराघरात लागलेल्या दिव्यांच्या प्रकाशाप्रमाणे, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-प्रथा-परंपरांचा अंधारही आपल्या जीवनातून दूर करण्याचा प्रयत्न करुया. आपलं राज्य सध्या कोरोना संकटाशी लढत आहे. ही लढाई लवकर जिंकायची असेल तर सर्वांनी कोरोना प्रतिबंधक नियमांचं पालन केलं पाहिजे. मास्क लावणं, गर्दी टाळणं, वारंवार हात धुत रहाणं, यासारखी दक्षता घेऊन प्रत्येकानं स्वत:ला, कुटुंबाला व समाजाला सुरक्षित ठेवण्यात योगदान द्यावं. दिवाळी सणाच्या काळात कोरोना आणि प्रदूषण वाढणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी, असं आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केलं आहे.


















# ...तर न्यायपालिकेवर कसा विश्वास ठेवावा?

हुल्लडबाजी ही नेहमीच अरजकतेला चिथावणी देणारी असते. त्यामुळे अशा हुल्लडबाजी बद्दल सरकारने निदान आता तरी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. केवळ सरकारनेच नाही तर न्याय पालिकेने सुद्धा अशा गोष्टींना आळा घालण्यासाठी प्रयत्न करायला हवा. पण सरकार पाठोपाठ आता न्याय पालिका सुद्धा हुल्लडबाजी करणाऱ्यांना अभय देत असल्याचे दिसत आहे. असे लोक उघडपणे बोलत आहेत, सोशल मीडियावर तर न्याय पालिकेच्या या भूमिकेबाबत प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. अर्णब गोस्वामीच्या बाबतीत सरकार आणि न्याय पालिकेची भूमिका संशयास्पद आहे असा लोकांचा जाहीर आरोप आहे. आणि यात प्रसारमाध्यमा मधील लोकांचा समावेश आहे. कारण प्रसारमाध्यमा मधील सच्चा बुद्धीवादी पत्रकार अर्णब गोस्वामी सारख्याला पत्रकार मानतच नाही, का त्याला पत्रकार मानावे? कारण कॅमेऱ्यासमोर आरडाओरडा करून निरर्थक हातवारे करण आणि त्यातून एखाद्या राज्याची, तिथल्या मुख्यमंत्र्यांची किंवा पोलिसांची हेतुपुरस्सर बदनामी करणे याला पत्रकारिता म्हणत नाहीत. म्हणूनच अर्णबच्या अटकेनंतर कुठल्याही पत्रकाराने नाराजी अथवा विरोध प्रकट केलेला नाही. पण सरकारने मात्र अर्णबची बाजू घेतली आणि सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा त्यावर शिक्कामोर्तब केला. त्यामुळे आता लोकशाहीवर आणि न्यायपालिकेवर लोकांनी कसा आणि का विश्वास ठेवावा? सरकार आणि न्यायपालिकेला शांततेने आणि समाजाभिमुख पत्रकारिता मान्य नसेल तर अर्णब सारख्या आणखी काही लोकांचा उदय होऊ शकतो. मग असे लोक चौथा स्तंभाची विश्वासार्हता कायम ठेऊ शकतात का? सरकार आणि न्यायपालिका देशाला कुठल्या दिशेने घेऊन चालली आहे तेच कळत नाही. अर्णब गोस्वामी हा एका आत्महत्या प्रकरणातील आरोपी आहे. आणि त्या प्रकरणाचा पत्रकारितेशी दुरान्वये ही संबंध नाही. अशावेळी एखाद्या प्रकरणात गुन्हा करणाऱ्याला पोलिसांनी अटक केली तर तो केवळ पत्रकार आहे म्हणून त्याला झालेली अटक बेकायदेशीर आहे असे म्हणायचे का? अन्वय नाईक आत्महत्या प्रकरण आणि त्यात अर्णब गोस्वामी याला झालेली अटक हा एक वेगळा विषय आहे त्याचा पत्रकारितेशी दुरांवय ही संबंध नाही, तरी सुद्धा देशाचे गृहमंत्री, पर्यावरण मंत्री आणि त्यांचा भाजपा पक्ष अर्णब सारख्या गुन्हेगाराची कशी काय बाजू घेऊ शकतो? केवळ महाराष्ट्र सरकार बरोबर तुमचे राजकीय मतभेद आहेत म्हणून जर तुम्ही अर्नबची बाजू घेणार असेल तर तुम्ही या देशात आणि खास करून प्रसार माध्यमांमध्ये चुकीचा पायंडा घालणार असाल तर ते एक प्रकारे अराजक्तेला प्रोत्साहन असेल. कारण जो समाज अर्णबच्या पत्रकारितेच्या विरोधात आज उभा आहे, तोही काही कमजोर नाही. त्यामुळे सरकार किंवा न्यायपालिका अर्णब सारख्या माथेफिरू माणसाला किती जरी प्रोत्साहन देणार असेल तरी लोकशाही मानणारा या देशातील बुद्धिजीवी माणूस कदापि अर्णबची पिसाळलेली पत्रकारिता सहन करणार नाही. अर्णब गोस्वामी याला अटक करणे चुकीचे आहे असे सरकारला जसे वाटते तसे सर्वोच्च न्यायालयाला सुद्धा वाटतेय आणि अर्णबला अंतरिम जामीन देताना सर्वोच्च नय्यालयाच्या न्याय मूर्तींनी जे विधान केले आहे ते धक्कादायक आहे. ते म्हणतात महाराष्ट्र सरकारने अर्णब गोस्वामी यांच्या टिव्ही वरील वक्तव्याकडे दुर्लक्ष करायला हवे होते, मी त्याची वहिनी पाहत नाही त्याचा विचार वेगळा असू शकतो. पण न्यायालयात अभिव्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व आहे. मात्र अर्णबचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाकारले जाण्याच्या प्रकरणात उच्च न्यायालयाची कामगिरी समाधानकारक नाही असे ताशेरे सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने ओढले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेबाबत लोकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आदरणीय न्यायमूर्ती म्हणतात आम्ही रिपब्लिक टिव्ही पाहत नाही. मग ते जर रिपब्लिक टिव्ही पाहत नसतील मग त्यांना अर्णबचे घाणेरडे चाळे आणि आक्रलेस्त्पणा कसा कळणार? आणि असे असताना अर्णबच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची पोलिसांनी गळचेपी केली असा निष्कर्ष कसा काय काढला जाऊ शकतो? असा सवाल लोक न्यायपालिकेला करीत आहेत. कुणी कुणाच्याही विरूद्ध काहीही कसेही बोलावे एखाद्या राज्याच्या प्रमुखाचा अपमान करायचा, पोलिसांवर बेछूट आरोप करायचे यालाच जर सर्वोच्च न्यायालय अभिव्यक्ती स्वातंत्र्य समजत असेल तर मग ओवेसी सारखे लोक किंवा जेएनयू मधील विद्यार्थी संघटना जी वादग्रस्त विधाने करतात आणि त्यातून सामाजिक समतोल बिघडतो त्या विधानांना सुद्धा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली न्यायालय अभय देणार आहे का? अभिव्यक्ती स्वातंत्र्याची नेमकी व्याख्या काय? हे एकदा सन्मानित सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट करावे म्हणजे अर्णब कॅमेरा समोर बसून जे काही बरळतोय ते योग्य आहे आणि कायद्यात बसणारे आहे असे आम्हीही मान्य करू असे देशातील जनतेचे म्हणणे आहे. सरकारवर पक्षपाती पणाचे आरोप होताच असतात, पण न्यायालयावर मात्र पक्षपाती पणाचा आरोप होता नये. कारण न्यायपालिकेवर लोकांची श्रद्धा आहे. म्हणूनच आजही एखाद्या माणसावर अन्याय झाला तर तो अन्याय करणाऱ्याला हेच सांगतो की आय विल सी यू इन कोर्ट कारण त्याला ठाऊक आहे की पोलिसांनी आपले एकले नाही, प्रशासनाने आपल्याला दाद दिली नाही तरी न्यायालय आपले म्हणणे एकूण घेईल आणि आपल्याला न्याय देईल सामाजिक माणसाचा न्यायपालिकेवर हा जो काही विश्वास आहे, त्याला न्यायपालिकेने तडा जाईल असे काही करू नये अर्णब सारखे लोक समाजासाठी घातक आहेत. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांना न्याय पालिकेने रान मोकळे करून देऊ नये. सर्वोच्च न्यायालयाने त्याला अंतरिम जामीन मंजूर करताच त्याचे आकाशाला हात लागले, जणू काही आपल्याला न्याय पालिकेने बेबंद शहीचा परवानाच दिलाय अशा आविर्भावात त्याने मिरवणूक काढली. पत्रकारिता आणि कायद्यावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी हा प्रकार चिंताजनक आहे. तेंव्हा हे कुठे तरी थांबायलाच हवे. न्यायप्रकिया जर पुराव्यांवर चालत असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय मुर्तींनी वेळात वेळ कडून रिपब्लिकन टिव्हीच्या बातम्या बघायलाच हव्यात. आणि त्यानंतरच त्यांनी अर्णब बाबतची भूमिका ठरवायला हवी असे जनतेचे म्हणणे आहे जे सोशल मीडियातून व्यक्त होत आहे. आदरणीय सर्वोच्च न्यायालयावर देशातील १३० कोटी जनतेचा केवळ विश्वासाचं नाही तर प्रचंड श्रद्धा आहे. आणि अर्णव सारख्या फालतू आणि वाचाळ माणसामुळे या श्रद्धेला तडा जाऊ नये येवढाच या देशातील जनतेचे म्हणणे आहे. कोणत्याही केसची पोलिसांनी एकदा फाईल बंद केली की सगळे संपले असे काही लोकांना वाटते. पण प्रत्यक्षात तसे नसते. एखाद्या प्रकरणाचा तपास पोलिसांनी बंद केला, पण फिर्यादी त्याबाबत समाधानी नसेल तर तो त्याला त्या प्रकरणाची फाईल पुन्हा ओपन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. अन्वय नाईक यांच्या पत्नीने तेच केले. आणि अन्वय नाईक प्रकरणात मागील सरकारने ज्या गोष्टी दाबून ठेवल्या होत्या त्या ओपन केल्या. त्यात अन्वय नाईक यांची अर्णब गोस्वामी यांनी ८३ लाखांची फसवणूक केली म्हणून अन्वय नाईक यांनी आत्महत्या केली असे सुसाईट नोट मध्ये लिहलेले आहे आणि डेथ बिफोर स्टेटमेंट हा कायदेशीर पुरावा मानला जातो. आणि या पूर्वीही असे पुरावे न्यायालयाने ग्राह्य मानलेले आहेत. अर्णबच्या बाबतीतही तेच आहे असे असताना पोलिसांनी त्याला केलेली अटक चुकीची आहे असे केंद्रीय गृहमंत्री कसे काय म्हणू शकतात? गृह मंत्रीच जर पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करू लागले, तर पोलिसांनी काम तरी कसे करायचे? त्यांचे खच्चीकरण होणार नाही का? याचाही सरकारने विचार करायला हवा. कारण हा विषय वाटतो तितका सोपा नाही. कारण आज जर सरकार किंवा न्याय पालिकेने अशी प्रकरणे चुकीच्या पद्धतीने हाताळली तर भविष्यात त्याचे वाईट परिणाम होऊ शकतात असे लोकांचे म्हणणे आहे.

# नमवले पण दमवले!



गोष्ट म्हणजे सत्ताधारी भाजप आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मोदींनी बिहारमध्ये अनेक प्रचार सभा घेतल्या भाजपचे अनेक स्टार प्रचारक मैदानात उतरले होते. तत्पूर्वी केंद्राने बिहारसाठी १६ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले होते. बिहारमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणून तरुणांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते. तरीही एनडीए आघाडीला अपेक्षित यश मिळाले नाही. केवळ भाजपचा फायदा झाला आणि बिहारमध्ये प्रथमच भाजपला ७० जागा मिळाल्या तर जेडीयूच्या जवळपास २८ जागा घटल्या. त्यामुळे मोदींनी लगेच बडे भाईचा आवाज बुलंद केला आणि त्यातून भाजपला काय म्हणायचे आहे ते स्पष्ट झाले. या निवडणुकीत महाआघाडी कुठे कमी पडली याची अनेक कारणे आहेत. त्यातील सर्वात मोठे कारण म्हणजे जनाधार गमावलेल्या काँग्रेसला ७० जागा देऊन आरजेडीने खूप मोठी चूक केली. कारण काँग्रेसचा यावेळीही टिकाव लागला नाही. त्यांना ७० पैकी केवळ १९ जागाच जिंकता आल्या मागच्या निवडणुकीत काँग्रेसने २७ जागा जिंकल्या होत्या. पण तेवढ्याही जागा त्यांना राखता आल्या नाही, जर काँग्रेसची स्थिती चांगली असती, तर भाजप जेडीयू आघाडीला शंभर जागाही जिंकता आल्या नसत्या केवळ काँग्रेस मुळेच महाआघाडीला अपेक्षित यश मिळू शकले नाही. अर्थात निकालावरून स्पष्ट दिसत आहे की बिहारमध्ये कुणाचेही सरकार येवो, पण ते स्थिर नसेल. कारण ज्यांना सत्ता मिळवण्यात यश येईल त्यांच्याकडे सरकार टिकवण्यया इतपत आघाडी नसेल. त्यामुळे घोडेबाजार होणार यात शंकाच नाही आणि अशा स्थितीत बिहारचे काय होणार हे त्या परमेश्वराला ठावूक. पण लालूंच्या दोन्ही पोरांची कमाल म्हणावी लागेल. कारण त्यांच्या समोर मोदी आणि नितीश कुमार यांच्या सारखे बलाढ्य धुरंदर असताना त्यांनी आरजेडीच्या कंदिलाचां प्रकाश काही कमी होऊ दिला नाही. बाप जेलमध्ये असतानाही त्यांनी सत्ताधाऱ्यांना चांगली लढत देऊन भविष्यात आपण चांगले राजकारणी होऊन केवळ बिहारला नव्हे तर देशाला नेतृत्व देऊ शकतो हे दाखवून दिले आहे. जर वयाच्य एकतीसाव्या वर्षी एखादा तरुण भाजपासारख्या सत्ताधारी पक्षाला आणि मोदी सारख्या देशातील लोकप्रिय नेत्याला यशस्वीपणे टक्कर देऊ शकतो, तर हा तरुण उद्या राष्ट्रीय राजकारणात आला तर भाजप सारख्या पक्षा समोर फार मोठं आव्हान उभे करू शकतो. कारण आज विरोधी पक्षाकडे मोदींच्या विरोधात सक्षम असा नेताच नाही. शरद पवार होते पण त्यांचं आता वय झालंय. त्यांना देशभर फिरण्याची दगदग आता झेपणार नाही. त्यामुळे तेजस्वीच्या रूपाने जर एक उमदा तरुण नेता विरोधी पक्षाला मिळणार असेल तर विरोधी पक्षातील पवारांची पोकळी भरून निघेल. स्वतः पवारांनी तेजस्वीचे कौतुक केलेले आहे. राहता राहिला प्रश्न काँग्रेस पक्षाचा तर आता काँग्रेसला पूर्वीचे दिवस येतील से वाटत नाही. कारण काँग्रेसकडे तसे सक्षम नेतृत्वच राहिलेले नाही. राहुल गांधी बिहारमध्ये सुधा फेल झाले. कारण मागील निवडणुकीत काँग्रेसने २७ जागा जिंकल्या होत्या. या निवडणुकीत त्यांच्या जागा कमी झाल्या त्यांना फक्त १९ जागा मिळाल्या ७० पैकी फक्त १९ जागा जिकने हे काँग्रेसच्या घसरलेल्या आलेखातून स्पष्ट झाले. त्यामुळे राहुल गांधी विरोधी पक्षासाठी आता सक्षम राहिलेले नाही. म्हणूनच तेजस्वी सारख्या तरुणाचे नेतृत्व पुढे येणे आणि त्याद्वारे देशाला एक तरुण आणि सक्षम निधर्मी वादी नेता मिळणे गरजेचे आहे.

बिहार विधानसभेच्या २४३ जागांसाठी तीन टप्प्यात झालेल्या निवडणुकीचा काल निकाल लागला. आणि भाजप प्रणित एनडीए आघाडीला सत्तेची आशा बाळगणे इतपत काठावरचे यश मिळाले. कारण काँग्रेस, आर्जेडीच्या महाआघाडी बरोबर लढता लढता सत्ताधारी जेडीयू आणि भाजपच्या तोंडाला अक्षरशः फेस आला होता. लालूंच्या काल परवाच्या शेंबड्या पोरांनी अनुभवी धुरंदर राजकारणी नितीश कुमार यांचे धोतर ढीले केले होते. पण थोडक्यात इज्जत बचावली आणि बिहारच्या सत्ता परीक्षेत एनडीए आघाडी काठावर पास झाली. नितीश कुमार यांच्या सुषासणाचा फार मोठा डंका पिटला जात होता, पण खरोखरच जर नितीश कुमार यांचे सुशासन होते तर मग विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाची इतकी वाईट अवस्था का झाली? मागील निवडणुकी पेक्षा या निवडणुकीत त्यांना कमी जागा का मिळाल्या? याचे उत्तर नितीश कुमार आणि त्यांच्या समर्थकांनी तसेच त्यांचा मित्र पक्ष असलेल्या मोदी भक्तांनी द्यावे. मुळात नितीश कुमार यांची राजकारणातली विश्वासार्हता काय? इथून सुरवात करायला हवी. २०१४ पासून मोदींचे तोंडही न बघणाऱ्या नितीश कुमारांनी एनडीएची साथ सोडून मागील निवडणुकीत लालूंच्या राजदशी सोयरिक केली आणि मुख्यमंत्रीपद मिळवले त्यानंतर काही काळाने त्यांना लालू भ्रष्ट असल्याचा साक्षात्कार झाला आणि लालूंची साथ सोडून पुन्हा भाजपच्या भजनी लागले. आणि भाजपच्या मदतीने बिहारमध्ये सरकार बनवले असा दलबदलू आणि संधीसाधू माणूस खरोखरच बिहारचा विकास करू शकतो का? यावर बिहारी जनतेने गंभीरपणे विचार करून नितीश कुमार यांना स्पष्टपणे नाकारले आहे. आता जेडीयूवाले सांगत आहेत की नितीश कुमार हेच मुख्यमंत्री होतील. कारण निवडणुकीत आघाडी करताना तसे ठरले होते. पण भाजपतील एक मोठा गट हे मानायला तयार नाही. कारण बिहारमध्ये ७०हून अधिक जागा जिंकणाऱ्या भाजपने जेडीयू पेक्षा डबल जागा मिळवल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री पदावर त्यांचा दावा रास्त आहे. आणि या निवडणुकीत बिहारी जनतेने जेडीयू आणि नितीश कुमार यांना स्पष्टपणे नाकारलेले असताना त्यांनी जर मुख्यमंत्री होण्याचा अट्टाहास केला, तर तो त्यांचा निर्लज्जपणा ठरेल. पण सत्तेसाठी असा निर्लज्जपणा यापूर्वीही त्यांनी केला आहे. त्यामुळे आताही तसेच करतील आणि त्यातून कदाचित पुन्हा भाजपा आणि जेडीयूमध्ये मतभेद होतील. पण एक गोष्ट मात्र नक्की कारण भारतात आजवर जेवढ्या विधानसभा निवडणुका झाल्या त्यातील बिहारची ही विधानसभा निवडणूक कमालीची चुरशीची ठरली. कारण सकाळच्या सत्रात महाआघाडीची लीड होती, तर दुपार नंतर एनडीए आघाडीने मुसंडी मारली आणि संध्याकाळी पुन्हा महाआघाडी भाजपच्या संख्या बाळाचा पाठलाग करू लागली. कोरोनामुळे एव्हीएम मशीन जादा वापरण्यात आल्या होत्या. त्यामुळे मत गणनेला उशीर होत होता. पण संध्याकाळी सात वाजेपर्यंत बऱ्यापैकी चित्र स्पष्ट झाले. आश्चर्याची

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# घातक स्टेरॉईड!



बॉलिवुड नट सलमान खान याने पहिल्यांदा सिनेमात टॉपलेसचा ट्रेंड आणला, यासह शरीरसौष्ठवी करणाचाही ट्रेंड आला. सिने नटांचे पाहून सामान्यांमध्येही शरीरसौष्ठवीकरण करण्याचा ट्रेंड आला. आजही लोकांमध्ये सिने अभिनेते किंवा मॉडेलप्रमाणे पिळदार, कसदार शरीरयष्टी बनवण्याची क्रेझ आहे. वसईतील रहिवाशी समीर साखरकर यांनादेखील शरीरयष्टी बनवण्याची आवड होती. शरीर घडवण्यासाठी त्यांनी जीम लावली पण त्यासह त्यांनी उत्तेजके आणि संप्रेरके घेण्यास सुरुवात केली. ज्यामुळे आज त्यांच्या दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाले आहेत. औषधांचे सेवन करू नका. अगदीच घ्यायचे असल्यास डॉक्टरांचा आवर्जून सल्ला घ्या, असे समीर साखरेकर यांनी सांगितले.

कसदार, पिळदार शरीरयष्टी बनविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या उत्तेजकांमध्ये स्टेरॉईड मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे शरीराची हानी होते. या उत्तेजकांमुळे जगभरातील अनेक नट, खेळाडू, मॉडेल, शरीरसौष्ठवपटू आदींना आपले आयुष्य गमवावे लागले आहे. असे असले तरी स्टेरॉईडचा वापर वर्षानुवर्षे वैद्यकीय उपचारांसाठी करण्यात येत आहे. दुर्बल आजार असलेल्या रूग्णांमध्ये होणारी स्नायूंची झीज टाळण्यासाठी १९३० सालापासून स्टेरॉईड औषधांसाठी वापरण्यास सुरुवात झाली. त्यानंतर जबर भाजलेल्या व्यक्तींनाही देण्यात येऊ लागले. मात्र पहिल्यांदा विना-वैद्यकीय स्टेरॉईडचा वापर दुसऱ्या महायुद्धात नाझी सैन्याने केला होता. सैनिकांची उत्तेजना वाढविण्यासाठी, त्यांना अधिक आक्रमक बनवण्यासाठी याचा वापर झाला होता. तसेच सोव्हिएत युनियनमधील ॲथलीटनादेखील स्टेरॉईड दिले जात होते. तर १९५० नंतर अमेरिकेतील ॲथलीट याचा वापर करू लागले. त्यानंतर जगभरात स्टेरॉईडचे सेवन वाढू लागले. स्टेरॉईड जगभरात लोकप्रिय झाले, मात्र १९६० नंतर त्याचे दुष्परिणाम दिसू लागले.

पहिल्यांदाच वाईट परिणाम होत असल्याचे नोंदवले गेले. १९८८ मध्ये अमेरिकेने ड्रग अँब्यूज ॲक्ट पास केले. त्यामुळे स्टेरॉईडच्या वापरावर कायद्याने बंदी आणली गेली. १९८८ या वर्षाला अमेरिकेतील 'स्टिरॉइड्सचे वर्ष' असे संबोधले गेले. कारण त्यावेळी साधारणपणे ३० लाख नागरिक स्टेरॉईड वापरत असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच अनेक ऑलिम्पिक ॲथलीटना स्टेरॉईड वापरताना पकडले गेले होते. संपूर्ण शरीरावर स्टिरॉइडच्या वापरामुळे परिणाम होतो. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी प्रणालींचे आरोग्य बिघडते. ज्यामुळे कोलेस्ट्रॉल, हृदयविकार, उच्च रक्तदाब, ॲनाफिलेक्टिक शॉक आणि मृत्यूचा आदींचा धोका संभवतो. प्रजनन प्रणालीवरही याचा प्रभाव पडतो. यामुळे जननेंद्रियाची झीज होते, जननेंद्रियांना सूज येते आणि त्यांचे कार्य बिघडते. ज्यामुळे वंध्यत्व, नपुंसकत्व, मूत्राशयावरील निमूळती ग्रंथी विस्तारते, गर्भाची हानी आणि मासिक पाळीत अनियमितता इत्यादी समस्या उद्भवतात. स्टेरॉईडमधील घटकांचा यकृत आणि मूत्रपिंडांवर सतत हल्ला होत असतो. यकृतावर स्टेरॉईडचा परिणाम झाल्यास कर्करोग, कावीळ, ट्यूमर आणि पेलोसीच्या हिपॅटायटीसचा आदी आजार होण्याची शक्यता बळावते. मूत्रपिंडाच्या नुकसानीमुळे मूत्रपिंड रोग होतात. तसेच त्वचेवरही परिणाम होऊ शकतो. मुरुम, तेलकट त्वचा, पुरळ उठणे, शरीरावर जांभळे किंवा लाल डाग, पित्ताच्या गाठी, शरीराचे केस वाढणे, डोक्यावर टक्कल पडते. तर स्टेॉईडमुळे हार्मोन्सवर परिणाम होतो. ज्यामुळे स्त्रियांमध्ये चेहऱ्यावरील केस वाढतात. तर पुरुष आणि स्त्रियांना मानसिक ताण येतो. मूड स्विंग्ज होतात, चीडचीड होते, भावनांवरील नियंत्रण सुटते. याचबरोबर उच्च रक्तदाब, मधुमेह, हाडे ठिसूळ होणे, डोळे कमजोर होणे, छातीत दुखणे, निद्रानाश इत्यादी आजार होतात. जीममध्ये शरीरयष्टी बनवण्यासाठी संप्रेरके आणि उत्तेजकांचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. तसेच त्याची विक्रीही जीममध्ये होते. मूळात जीम व्यवसायाला कोणतेही नियम, मर्यादा नाहीत. यामुळे जीम प्रशिक्षक हे सर्टीफाईड नसतात. अनेकदा त्यांना या संप्रेरके आणि उत्तेजकांविषयी कसलीच माहिती नसते. त्यामुळे शासनाने या क्षेत्रात नियमावली आणणे गरजेचे आहे. उत्तेजके, संप्रेरके यांची योग्य ती चाचणी करून गुणवत्ता निश्चित करणे गरजेचे आहे. जेणेकरून एकाच दर्जाच्या उत्पादकांची विक्री जीमद्वारे केली जाईल. तसेच सेवन करणाऱ्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेणे अनिवार्य आहे. सामान्य नागरिक सिने नट, खेळाडू, शरीरसौष्ठवपटू यांचे अनुसरण करायला जातात. मात्र हेच सामान्य, मध्यम-निम्न मध्यवर्गीय नागरिक याला बळी पडतात. हलक्या दर्जाची, शरीराचे नुकसान संप्रेरके, उत्तेजके घेतात. ज्यामुळे त्यांना भयंकर आजारांचा सामना करावा लागतो. त्यामुळे किमान फॅमिली डॉक्टरचा तरी सल्ला घेऊनच अशाप्रकारच्या उत्तेजके आणि संप्रेरकांचे सेवन करावे, योग प्रशिक्षक अमोल प्रभू यांनी सांगितले.

**दिशायन**



हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# महिला व बालकांवरील अत्याचारांना लगाम घालण्यासाठी नियोजनबद्ध काम करणार; ॲड.यशोमती ठाकूरांची ग्वाही



**मुंबई/प्रतिनिधी**

महिला व बालकांवर अत्याचार करणाऱ्या विकृत मनोवृत्तीला लगाम घालून त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी महिला व बालविकास विभाग नियोजनबद्धरित्या काम करेल, अशी ग्वाही महिला व बाल विकास मंत्री ॲड.यशोमती ठाकूर यांनी दिली. बालदिनानिमित्त महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात कोविड काळात उत्कृष्ट काम केल्याबद्दल कोविड योद्ध्यांच्या सन्मानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. महिला व बालविकास विभागाच्या सचिव श्रीमती आय. ए. कुंदन, आयुक्त डॉ. ऋषिकेश यशोद, युनिसेफच्या बालसंरक्षण तज्ज्ञ अल्पा वोरा, मॅक्सवुमनच्या संपादक प्रियदर्शनी हिंगे व्यासपीठावर उपस्थित होत्या.

महिलांच्या कल्याणासाठी खूप काम करणे आवश्यक असून महिला धोरणाची प्रभावी अंमलबजावणी येत्या काळात करायची आहे, असे सांगून ॲड.यशोमती ठाकूर म्हणाल्या की, महिला, बालके तसेच तृतीयपंथीयांच्या मागे ज्याप्रमाणे शासन उभे आहे त्याचप्रमाणे समाजानेही उभे राहिले पाहिजे. अत्याचारग्रस्त बालके आणि महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. बाल लैंगिक शोषण तसेच महिलांवर अत्याचार करणाऱ्या विकृत मनोवृत्तीला लगाम घालायचा असेल तर तो गप्प बसून सहन न करता त्याविरुद्ध आवाज उठवलाच पाहिजे. अशा घटकांना बोलण्यासाठी प्रवृत्त करणे तसेच त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विभागाकडून आगामी काळात नियोजनबद्धरित्या काम केले जाईल, असेही ॲड.यशोमती ठाकूर म्हणाल्या. कोविड काळामध्ये माता- बाल पोषण, बालविवाह प्रतिबंध, आरोग्य आदी क्षेत्रामध्ये केलेल्या कामाबद्दल तुम्हाला 'हॅट्स ऑफ' असे म्हणत ॲड.यशोमती ठाकूर यांनी यावेळी पुरस्कारार्थींबद्दल गौरवोद्गार काढले. अंगणवाडी सेविकांनी माता- बालकांना पोषण आहार पोहोचविण्यासाठी मोठे काम केले असेही त्या म्हणाल्या. सक्षम महिला, सदृढ बालक आणि सुपोषित महाराष्ट्र ही जन चळवळ गतीमान करण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या.

सचिव श्रीमती कुंदन म्हणाल्या की, बालकांचे कायदेशीर संरक्षण तसेच मानसिक, शारीरिक तंदुरुस्ती साधणे हे महिला व बालविकास विभागाचे प्राथमिक ध्येय्य आहे. पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब गरजेचा असून विभागाने त्यादृष्टीने काम सुरू केले आहे. त्यानुसारच जेजेआयएस' मोड्यूल विकसित करण्यात आले आहे. बालकांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी महत्त्वाच्या ठरु शकणाऱ्या ग्राम बालसंरक्षण समित्या (व्हीसीपीसी) बळकट करण्याकडे विभाग गांभिर्याने लक्ष देत आहे, असेही कुंदन यांनी सांगितले. डॉ. यशोद यांनी सांगितले की, महिला व बालकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने काम करत असताना विविध यंत्रणांशी समन्वयाचे काम आव्हानात्मक असते. त्यासाठी विभागाकडून तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग केला जाईल.

ज्युवेनाईल जस्टीस बोर्डसाठी विकसित करण्यात आलेले ज्युवेनाईल जस्टीस इन्फॉर्मेशन सिस्टीम (जेजेआयएस) मोड्यूल विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकांना बाल न्याय मंडळासमोर सादर करणे, त्यांना समुपदेशन, पुनर्वसन, आवश्यक मदत आदींच्या अनुषंगाने कार्यवाही, पोलिसांकडे अर्ज पाठविणे, तपास अधिकाऱ्यांनी तपास कार्यवाहीचा तपशील भरणे आदी बाबी यामाध्यमातून यापुढे ऑनलाईन होणार आहेत. या सर्व प्रक्रिया यापूर्वी पत्रव्यवहाराच्या माध्यमातून होत असल्यामुळे विलंब लागत होता. आता ऑनलाईन यंत्रणेमुळे विधीसंघर्षग्रस्त बालकांची देखरेख आणि या प्रक्रियेचे संनियंत्रण ऑनलाईनरित्या करणे सोपे होणार आहे. तसेच सर्व अद्ययावत डाटा वेळीच उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमात जेजेआयएस मोड्यूलचे उद्घाटन, बाल लैंगिक शोषणाच्या अनुषंगाने बालकांचे लैंगिक शोषण, सुरक्षितता त्यांची- जबाबदारी आपली या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन, व्हीसीपीसीसाठी बाल संरक्षणाच्या अनुषंगाने माहितीचा समावेश असलेल्या चित्रफीती, पोस्टर्स आदी साहित्याच्या कीटचे अनावरण यावेळी करण्यात आले. तसेच राज्यात कोविड कालावधीमध्ये विषेश काम केलेल्या आणि सेवा दिलेल्या महिलांचा गौरव, बाल विवाह प्रतिबंध कामात विशेष कार्य केलेल्या अधिकारी-कर्मचारी आणि संस्थांचा सत्कार, राजमाता जिजाऊ माता-बाल पोषण अभियान अंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कारही यावेळी करण्यात आला. कोविडदरम्यान आपल्या प्राणांचीही पर्वा न करता कर्तव्य बजावताना मृत्यू पावलेल्या कोविड योद्ध्यांना यावेळी ॲड.यशोमती ठाकूर यांच्या सूचनेनुसार श्रद्धांजली वाहण्यात आली.

# पालघर जिल्ह्यात छायाचित्रासह मतदार यादी संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषीत





**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हयामध्ये दिनांक ०१/०१/२०२१ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषीत केला आहे. कार्यक्रमाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. १. एकत्रीकृत प्रारुप मतदार यादयांची प्रसिध्दी, दि.१६ नोव्हेंबर २०२० (सोमवार), २. दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी, दि. १६ नोव्हेंबर २०२० (सोमवार) ते दि .१५ डीसेंबर २०२० (मंगळवार), ३. विशेष मोहिमांचा कालावधी, दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी निश्चित केलेले दोन शनिवार आणि रविवार. ४. दावे व हरकती निकालात काढणे, दि. ०५ जानेवारी २०२१ (मंगळवार) पर्यत ५. प्रारूप मतदार यादीच्या मापदंडाची तपासणी करणे आणि मतदार यादीच्या अंतिम प्रसिध्दी करिता आयोगाची परवानगी घेणे, दि. १४ जानेवारी २०२१ (गुरुवार) पर्यत ६. डाटाबेसचे अद्यावतीकरण आणि पुरवणी यादीची छपाई इत्यादी, दि. १४ जानेवारी २०२१ (गुरुवार), ७. अंतिम मतदार यादी प्रसिध्दी, दि. १५ जानेवारी २०२१ (शुक्रवार), जिल्हयातील रहिवाश्यांनी दि. १६ नोव्हेबर २०२० ते दि. १५ डीसेंबर २०२० या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे योग्य तो फॉर्म-नमुना नोंदविणेकामी आवाहन करणेत येत आहे. १) फॉर्म-नमूना नं. ६ - नव्याने मतदार नोंदणी करणे, २) फॉर्म-नमूना नं. ७- मयत मतदार, कायमस्वरुपी स्थलांतरीत मतदार यांचे मतदार यादीतील नाव वगळणेकामी, ३) फॉर्म- नमूना नं. ८- मतदार यादीतील नावांची किंवा तपशीलाची दुरुस्ती करणेकरिता, ४) फॉर्म- नमूना नं. ८ अ- मतदार संघामध्ये स्थलांतर झाले असल्यास नाव नोंदणीकरिता.

दि.०१ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने नाव नोंदणी करणेचे शिल्लक असल्यास अशा नवतरुण मतदारांना मा.भारत निवडणूक आयोग, यांनी पुन्हा संधी दिली आहे. त्यामुळे अशा मतदारांनी तसेच इतर काही मतदार आहेत ज्यांची नावातील दुरुस्ती कायमस्वरुपी स्थानात बदल मयत मतदार असे अर्ज संबंधित तहसिलदार कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय तसेच मतदान केंद्र स्तरीय अधिकारी यांना नियुक्त केलेल्या ठिकाणी सादर करता येतील. मतदार यादया पुनरिक्षण कार्यक्रमाकामी पालघर जिल्हातील सर्व नागरिकांनी तसेच सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करणेबाबत डॉ. माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पालघर यांनी आवाहन केले.

# मानव वन्यजीव संघर्ष तीव्र असलेल्या ३३ गावांचा नव्याने समावेश - संजय राठोड

**मुंबई/प्रतिनिधी**

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेत यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील मानव - वन्यजीव संघर्ष तीव्र असलेल्या व वाघ भ्रमण मार्गात येणाऱ्या ३३ गावांचा नव्याने समावेश करण्यात आला असल्याची माहिती वन मंत्री संजय राठोड यांनी दिली. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राज्यात राबवण्यात येत आहे. जन, जल, जंगल व जमीन या संसाधनांचा शाश्वत विकास करणे व मानव - वन्यप्राणी संघर्ष कमी करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

या योजनेअंतर्गत ग्रामीण जनतेचा सहभाग घेऊन संयुक्त वन व्यवस्थापन समिती व परिस्थितीकीय विकास समिती यांच्यामार्फत कामकाज करण्यात येत आहे. यामुळे गावातील संसाधनांची उत्पादकता वाढवली जात असून त्यामुळे राज्यात पर्यायी रोजगार निर्माण होत आहे. ही योजना प्रामुख्याने बफर क्षेत्र, वनालगत असलेली गावे, वन्यप्राणी भ्रमण मार्ग गावे, ग्रामवने, व्याघ्र प्रकल्प व अभयारण्यापासून दोन किलोमीटर मधील गावे तसेच मानव - वन्यजीव संघर्ष गावे यांचा समावेश करून राबवली जात आहे. भविष्यात या योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत कार्यवाही केली जाणार असून वन्यजीव - मानव संघर्ष कमी करण्यास प्राथमिकता दिली जाणार आहे, अशी माहितीही संजय राठोड यांनी दिली.

# अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विशेष पंधरवड्याचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत शासकीय/स्वंयसेवी बालगृहात दाखल होणाऱ्या अनाथ मुलांना संस्थेतुन बाहेर पडताना त्यांच्या जवळ जातीचे प्रमाणपत्र नसल्या कारणाने, त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सवलती, अनुदान व विशेष लाभ मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होत असल्यामुळे महिला व बाल विकास विभाग निर्णय दिनांक- ६ जुन २०१६ अन्वये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित /विनाअनुदानित) संस्थांमध्ये दाखल असलेल्या खालील निकष पुर्ण करणाऱ्या संस्थेतील अनाथ मुलांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार राज्यातील पात्रताधारक अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता विभागीय स्तरावर दिनांक १४ ते ३० नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये पंधरवडा राबविण्यात येत आहे. सदरचा पंधरवडा यशस्वीपणे राबविण्याकरीता विभागांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व यंत्रणा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समिती, बालकांच्या काळजीसाठी कार्यरत असलेल्या संस्थाचे अधिक्षक, व इतर सर्व संबंधीत माहिती होण्याकरीता तसेच अनाथ प्रमाणपत्रा संबंधीचे सर्व प्रलंबीत अर्ज निकाली काढून प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी संबंधीत जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयामध्ये संपर्क साधण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

आई-वडीलांचा शोध घेवून त्यापैकी कोणीच हयात नसल्याबाबतची खात्री संबंधी यंत्रणेस झाली असणे व त्याबाबतचे संस्थेचे अधिक्षक यांचे प्रमाणपत्र जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे. संबंधीत जिल्हयाच्या बाल कल्याण समितीने सदर लाभ्याथ्यांचे आई-वडील हयात नसल्याचे व लाभार्थी अनाथ असल्याचे चौकशी अंती प्रमाणीत करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी बाल कल्याण समितीने जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश निर्गम रजिस्टरचा दाखला यापैकी एक ग्राह्य धरला जाईल. वरील निकष पूर्ण करणारे मुल, ज्या संस्थेत आहे, त्या संस्थेच्या अधिक्षकांनी अनाथप्रमाण पत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांच्याकडे सादर करावा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर हे सदर प्रस्तावाची छाननी करून, परिपुर्ण प्रस्ताव, स्वयंस्पष्ट शिफारस करून, संबंधीत विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांच्या कार्यालयाकडे पाठवतील. अशी माहिती संदीप सं. यादव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी एका प्रसिद्धि पत्रकाद्वारे कळविली आहे.

# आमदार बाबासाहेब पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील पंधरा सदस्यांची नियुक्ती

**अहमदपूर/प्रतिनिधी**

लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय आयुर्विज्ञान संस्थेसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्याचे वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिककार्य मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आले असून अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्यासह एकूण १५ सदस्य या मंडळात असणार आहेत. वैद्यकीय महामंडळाचे कामकाजाचे व्यवस्थित नियमन व्हावे,रुग्णांना योग्य पध्द्तीने उपचार मिळावेत या उद्देशाने शासनाकडून सदरील अभ्यागत मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

या समितीचे अध्यक्ष जिल्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख राहणार असून, जिल्ह्यातील विधानपरिषद सदस्यातून, आमदार बाबासाहेब पाटील, तसेच दिपाली राजीव कसबे (मागासवर्गीय महिला),मनिषा श्रीरंग कोकणे(महिला सामाजिक कार्यकर्त्या), बेंजामिन योहान दुप्ते(तज्ञ् प्रतिनिधी), ॲड. फारुक कासिमसाब शेख (सामाजिक कार्यकर्ते) डॉ. सचिन हनुमंतराव सगर (तज्ञ व्यक्ती) विशाल विठ्ठलराव विहारे, लक्ष्मण पिराजी कांबळे (सामाजिक कार्यकर्ता)आणि त्र्यंबक गुरुनाथ स्वामी (वर्तमानपत्राचा प्रतिनिधी) हे सदस्य राहतील. याशिवाय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, आरोग्य उपसंचालक, महानगरपालिकेच्या आरोग्य समितीचे अध्यक्ष, वैद्यकीय महाविद्यालयाचे कर्मचारी प्रतिनिधी, वैद्यकीय महाविद्यालयातील एक विभाग प्रमुख हेही या समितीचे सदस्य राहणार आहेत.

# ट्रॅक्टर चोराच्या लातूर पोलिसांनी आवळल्या मुसक्या



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक एन. डी. उबाळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड त्यांच्या सहकाऱ्यांनी रामेगाव येथून चोरीस गेलेला ट्रॅक्टर बारा तासाच्या आत आरोपी सह जप्त केला आहे. या घटनेची सविस्तर माहिती अशी की, बाळासाहेब माणिक राठोड वय २८ रा. रामेगाव तांडा ता. जि. लातूर यांचा दि ३ नोव्हेंबर २०२० रोजी मध्यरात्री रामेगाव तांडा येथून महिंद्रा अर्जुन अल्ट्रा - १ कंपनीचे लाल रंगाचे ट्रॅक्टर क्रमांक एम एच २४ एजी ०४७७ त्याची अंदाजे किंमत ३,५०,००० रुपये कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता. याविरुद्ध गातेगाव पोलीस ठाणे येथे गुरं न. १३५/२०२० कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन करत पथके तयार करुन गुन्हा उघडकीस आणण्या संदर्भाने सूचना केल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक एन. डी.उबाळे, सुरज गायकवाड व सुनील रेजीतवाड यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सायबर पोलीस ठाण्यात वेगवेगळी पथके नेमून आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली.



४ नोव्हेंबर रोजी सायबर सेल व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वाहनाचा व आरोपीचा शोध घेत मुरुड जात असताना गुप्त माहिती मिळाली की एक इसम ट्रॅक्टरचे हेड घेऊन लातूर वरवंटी रायवाडी जात आहे. सदरचे ट्रॅक्टर हे चोरीचे आहे अशी माहिती मिळाल्यावरून रायवाडी शिवारात आरोपीचा शोध घेत असताना एक इसम रोडने ट्रॅक्टर भरधाव वेगाने जात असल्याचा दिसला त्याचा पाठलाग करून पळून जात असलेल्या संशयित इसम शिवदर्शन सदाशिव हिंगमिरे वय २७ रा. हरंगुळ यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीस गेलेला महिंद्रा अर्जून ट्रॅक्टर ताब्यात घेऊन त्याबाबत अधिक विचारणा केली असता त्यांनी सदर ट्रॅक्टर चोरी केल्याचे कबूल केले, त्याचबरोबर हिरो कंपनीचे स्प्लेंडर वाहन क्रमांक एम एच २४ ए व्ही ८७१९ चोरी केल्याचेही सांगितले. सदर आरोपीच्या ताब्यातून गुन्ह्यातील केलेल्या मुद्देमाल महिंद्रा अर्जून ultra-1 कंपनीचे लाल रंगाचे ट्रॅक्टर हेड व ५० हजार रुपये किमतीची मोटरसायकल असा एकूण चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास गातेगाव पोलीस ठाणे करीत आहेत. सदरची कामगिरी जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरज गायकवाड, पोलीस नाईक प्रदीप स्वामी, अमर वाघमारे, तसेच सुनील रेजितवाड पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा लातूर, पोलीस हवालदार राम गवारे, पो.ना. सिद्धेश्वर जाधव, सुधीर कोळसुरे पोलीस शिपाई राजू म्हस्के यांनी केली.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता**

**पालघर पाटबंधारे विभाग, मनोर (पालघर) यांचे कार्यालय**

**पत्ता : सूर्या प्रकल्प वसाहत, मनोर, ता.जि. पालघर - ४०१४०३, ई मेल पत्ता :** eepidpalghar&gmail.com/ **दूरध्वनी क्र. +९१ ८००७३३५३७३**

**ई-निविदा सूचना क्रमांक ०३/ सन २०२०-२१**

कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| ३.१ | सुर्या उजवा तीर कालव्याच्या कि.मी. १ सा.क्र. ००१४५० मी. ००१५९२ मी. कि.मी. १२ सा.क्र. ११/०८०, कि.मी. १४ सा.क्र. १३/८५०, १४/४७५ मी., कि.मी. २६ सा.क्र. २५/२५०, कि.मी. ४ सा.क्र. ३/३६०, ५/२७०, कि.मी. १५ सा.क्र. १४/२८०, कि.मी. १६ सा.क्र. १५/३४५, दि. ०१/०७/२०१९ व ०२/०७/२०१९ या कालावधीत नादुरुस्त माती भराव/ दगडी अस्तरीकरण / बांधकाम क्षती झाल्यामुळे पुनःस्थापना करणे. | पालघर | १५,५१,८७१/- |
| ३.२ | सुर्या उजवा तीर मुख्य कालव्यावरील पालघर शाखा क्र. २ वरील कोंकणसिंचन हंगाम सन २०२०-२१ सुरळीत पार पाडम्यासाठी वितरण प्रणालीच्या सिंचन व्यवस्थापनेचे अनुषंगिक कामे करणे. | पालघर | ९,४४,७५०/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १८/११/२०२० (दुपारी १२.०० वा.) ते दिनांक ०१/१२/२०२० (दुपारी १२.०० वा.)
ई-निविदा उघडणे : दिनांक ०२/१२/२०२० (दुपारी ३.०० वा.)

**खालील संकेत स्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१) http://wed.maharshtra.gov.in

२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर यांचे कार्यालयीन सूचना फलक.

**जा.क्र. पापावि/लेशा-३/२५११/सन २०२०, दि. ०३/११/२०२०**
**कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांचे कार्यालय,**
**सूर्याप्रकल्प वसाहत, मनोर, ता.जि. पालघर**

**सही/-**
**(र. भा. पवार)**
कार्यकारी अभियंता,
पालघर पाटबंधारे विभाग, मनोर

**जिमाका/पालघर/जाहि ३२/४५७/२०२०     दिनांक : १०/११/२०२०**

16 TO 22 NOV 2020 - Page 6 (CRIME SANDHYA) new:Layout 1 13/11/2020 9:03 PM Page 1



# इमानदार वाहक व चालकाच्या पाठीवर कौतुकाची थाप

## आमदार शांताराम मोरे यांच्या कडून सन्मान



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा आगारातील वाहक व चालक यांनी प्रवाशाची बस मध्ये विसरून गेलेली रक्कम रुपये तीन लाख, सोने व मोबाईल नाशिक एस. टी. आगारातील सुरक्षा विभागात प्रामाणिकपणे जमा करुन एक आदर्श निर्माण केल्याने त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे व शहापूरचे माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनीही गुरुवारी (दि. १२) वाडा बस आगारात जाऊन वाहक गणेश धनगर व चालक सदानंद गुरव यांचा यथोचित सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. वाडा आगाराची वाडा - अक्कलकुवा ही बस रविवारी (दि. ८) सकाळी सव्वासात वाजता वाडा बसस्थानकातून सुटली. या गाडीवर वाहक गणेश धनगर व चालक सदानंद गुरव हे आपले कर्तव्य बजावत होते. वाडा, त्र्यंबकेश्वरहून प्रवासी घेऊन गाडी नाशिक येथे पोहचली. नाशिक मध्ये काही प्रवासी उतरले व गाडी पुन्हा मार्गस्थ झाली. चांदवड दरम्यान बस पोहचली असता नाशिक आगारातून वाहक धनगर यांना फोन आला आणि बसमध्ये एक बॅग राहिल्याचे कळविले. त्यानुसार गाडीतील अनोळखी बॅग इतर प्रवाश्यांची नाही याची धनगर यांनी खातरजमा करुन ती बॅग चालक गुरव यांच्या जवळ देवून सुरक्षितपणे मालेगाव स्थानकात आणली. मालेगाव येथील बस आगारातील अधिकाऱ्यांसमक्ष बॅगेतील वस्तूंची शहानिशा करण्यात आली. बागेमध्ये ३ लाख रुपये, सोन्याचे दागिने व नवीन मोबाईल असा किंमती ऐवज होता. वाहक धनगर व चालक गुरव यांनी ही रक्कम, दागिने आणि मोबाईल तेथील सुरक्षा विभागाकडे सुपूर्द केला होता. या घटनेने वाहक व चालक यांनी समाजासमोर एक आदर्श घालून दिल्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून, दूरध्वनीद्वारे त्यांच्यावर कौतुकाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत होता. मात्र आज ते आपले कर्तव्य बजावून वाडा आगारात आल्यानंतर वाडा आगाराच्यावतीने देखिल त्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. दरम्यान प्रवासी संघटना, सामाजिक संघटना यांनीही यावेळी गुरव व धनगर यांचा सत्कार केला. यावेळी पंचायत समितीचे सभापती योगेश गवा, शिवसेनेचे तालुका प्रमुख उमेश पटारे, तालुका सचिव निलेश पाटील, एस. टी. कामगार सेनेचे जिल्हा कार्याध्यक्ष मोहन पाटील, वाडा आगार व्यवस्थापक मधुकर धांगडा, उपतालुका प्रमुख तुषार यादव, पंचायत समिती सदस्य अमोल पाटील, पांडुरंग पटारे, प्रमोद घोलप, तुषार भानुशाली व आगारातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


कृषी उत्तपन्न बाजार समिती उदगीर
ता.उदगीर जि. लातूर

सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची बाजार समीती - उदगीर बाजार समीती

**जाहीर आवाहन**

उदगीर तालूक्यातील शेतकरी बंधूनी शेतमाल तारण योजनेच्या सुर्वणसंधीचा लाभ घ्यावा

- उदगीर तालूक्यातील शेतकरी बंधूनी सोयाबीन व शेतमालाच्या हंगामामध्ये भावतील होणाऱ्या घसरणीमुळे शेतमाल न विकता शेतमाल तारण कर्ज योजनेअर्तंगत आपला शेतमाल उदगीर बाजार समीतीच्या गोदामात ठेवावा.
- सदर योजनेत गोदाम भाडे निशुल्क आहे.
- या योजनेत शेतमाल (सोयाबीन) ठेवल्यास त्वरीत चालू बाजार भावाच्या ७५% ग्रेडीग प्रमाणे ६% व्याज दराने सहा महिनेकरीता त्वरीत कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.
- शेतकरी बांधवांनी सोयाबीन व तूर हे स्वच्छ करून वाळवूनच घेवून यावे. ज्यामुळे मालाची गुणवत्ता चोगली राहील.
- सोयाबिन व तूर शेतमाल घेवून येताना कलतानी बारदाना मध्येच आणावा. जेणे करून मालाची गुणवत्ता चांगली राहील.
- शेतकरी बंधूनी सोबत येताना आपला चालू वर्षाचा सातबारा पिकपेऱ्याच्या नोंदीसह, अधारकार्ड व बँक पासबुकच्या छायांकित प्रतिसह माल आणावा.

मा.भगवानराव पाटील, सचिव | मा.रामराव बिरादार, उपसभापती | मा.सिध्देश्वर पाटील, सभापती

व सर्व संचालक मंडळ,कर्मचारी वृंद
कृषि उत्तपन्न बाजार समिती उदगीर

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा


# महाराष्ट्रात दिवाळी अंक घरा-घरात पोहचतात आणि त्याचे आवडीने वाचन केले जाते, तो पर्यंत मराठी भाषेला धोका नाही

## २१व्या 'लीलाई दिवाळी विशेषांका'चे प्रकाशन करताना फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांची ग्वाही!



**वसई/प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या हस्ते आज सकाळी २१ व्या 'लीलाई दिवाळी विशेषांका'चे प्रकाशन सत्पाळा (ता. वसई, जि. पालघर ) येथील एका निसर्गरम्य वाडीत करण्यात आले. याप्रसंगी 'लीलाई'चे मार्गदर्शक, तथा ज्येष्ठ पत्रकार अँड्रू कोलासो, वसई कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाह रेमण्ड मच्याडो, पदाधिकारी विजय पाटील, साहित्यरसिक जेम्स लोबो आणि 'लीलाई'चे संस्थापक संपादक अनिलराज रोकडे प्रामुख्याने उपस्थित होते.

गेली वीस वर्षे सातत्याने दर्जेदार दिवाळी अंक देणाऱ्या 'लीलाई' परिवाराने यंदाच्या महामारीच्या अतिशय प्रतिकूल काळातही उत्कृष्ट साहित्य देण्याच्या परंपरेशी तडजोड न करता अथक प्रयत्नातून अगदी वेळेत अंक प्रसिद्ध केल्याबद्दल संपादक मंडळाचे कौतुक करून, याप्रसंगी फा. दिब्रिटो पुढे म्हणाले की, दिवाळी अंक आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलन या दोन महत्वाच्या बाबी मराठी अस्मितेची प्रतीके आहेत. देशात अन्य राज्यात नसतील, पण महाराष्ट्रात मराठी माणसाने ही प्रतीके जिवंत ठेवली आहेत. यामुळे आपले जीवन अधिक संपन्न आणि श्रीमंत होत आहे. दिवाळी अंकांमुळे नवोदितांच्या लेखनाला कोवळे कोंब फुटतात आणि प्रतिभावंतांच्या साहित्याला नवा मोहोर फुलून येतो. मराठीचे काय होणार? अशी शंका अधून मधून व्यक्त व्यक्त केली जाते. परंतू जो पर्यंत दिवाळी अंक स्टॉलवर झळकून, घरा घरात पोहचतात आणि त्याचे आवडीने वाचन केले जाते, तो पर्यंत मराठी भाषेला कोणताही धोका नाही, असा ठाम विश्वासही फा. दिब्रिटो यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. 'लीलाई'चे संस्थापक संपादक अनिलराज रोकडे यांनी फा. दिब्रिटो आणि अन्य अतिथींचे आभार मानले.






















































16 TO 22 NOV 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 13/11/2020 9:09 PM Page 1



# वसई विरार महानगरपालिकेतील २९ गावे वगळण्यासाठी हरकती!




**नवी मुंबई/प्रतिनिधी**

वसई-विरार महानगरपालिकेतून २९ गावे वगळणेबाबत दि.८ ऑक्टोंबर २०२० रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील २९ गावातील सर्व संबंधित व्यक्ती, नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी, संघटना यांनी या विषयीच्या आपल्या लेखी सूचना व हरकती दि.२५ नोव्हेंबर २०२० पर्यत सादर कराव्यात. असे विभागीय आयुक्त, कोकण विभाग , नवी मुंबई यांनी कळविले आहे.

सद्यस्थितीत कोविड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेता प्रत्यक्ष सुनावण्या घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील व्यक्ती, संस्था, लोकप्रतिनिधी यांना आपल्या लेखी हरकती, सूचना, निवेदने सादर करण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक असल्याने हरकती, सूचना, निवेदने लेखी स्वरुपात स्विकारण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित केला आहे व अधिकारी यांना निर्देशित करण्यात आले आहे. लेखी सूचना व हरकती दाखल करण्याचा कालावधी दि.१७ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२० (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत) असा राहील. सूचना व हरकती दाखल करण्याची ठिकाणे पुढीलप्रमाणे १) उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय वसई जि.पालघर २) उपायुक्त (सामान्य), वसई-विरार पालिका उपायुक्त यांचे कार्यालय, विरार जि.पालघर ३) निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जि. पालघर ४) प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन विभाग, कोकण भवन नवी मुंबई. तरी उक्त कार्यक्रमानुसार वसई-विरार महापालिकेतून २९ गावे वगळण्याबाबत संबंधित इच्छुक व्यक्ती, संस्था, लोकप्रतिनिधी यांनी उपरोक्त नमुद ठिकाणी सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत लेखी हरकती, सूचना, निवेदने सादर कराव्यात. असे विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# ग्राहक बनून आला अन् लाखो रुपयांचे सोने चोरून पळाला



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या एका दुकानात एक भामटा ग्राहक बनून सोने खरेदीसाठी गेला आणि दुकानदारचे लक्ष विचलित होताच लाखो रुपयांचे सोनाचे दागिने चोरून पसार झाला. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली आहे. वाडा बस स्थानका जवळ असलेल्या पूजा ज्वेलर्स या दुकानात एक ग्राहक तोंडाला मास्क बांधून आला आणि सोन्याची चैन पसंत केली व सोन्याची अंगठी दाखविण्यास सांगितले दुकानदार अंगठी घेण्यासाठी वळला असता अतिशय स्फूर्तीने सोन्याचे दोन ट्रे घेऊन पसार झाला.अशी माहिती दुकानाचे मालक मोटाराम यांनी दिली. सदरचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून या प्रकरणी वाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली असल्याची माहिती मोटाराम यांनी दिली आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### ११ कर्मचारी शिस्तभंगाच्या कचाट्यात

भिवंडी : शासकीय सेवा प्रवेश करताना मत्ता व दायित्व यांची विवरणपत्र सादर न करता शासनाच्या निर्णयाची पायमल्ली करणारे ठाणे आरटीओ मधील ११ कर्मचाऱ्यांना शिस्तभंगाच्या कारवाईस सामोरे जावे लागत असल्याने परिवहन विभागात सर्वत्र खळबळ माजली असून याप्रकरणी शरद धुमाळ, अध्यक्ष राष्ट्रीय मानव हक्क मंच यांनी केलेल्या प्रयत्नांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. शासकीय निमशासकीय कार्यालयात सातत्याने वाहत असलेल्या भ्रष्टाचारास व गैरव्यवहारास आळा बसावा या करिता शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असते. या प्रश्नांचा भाग म्हणून शासनाच्या सेवेत प्रवेश करताना कनिष्ठ कर्मचारी म्हणजेच शिपाई व कामगार श्रेणीचे कर्मचारी वगळता वर्ग १ ते वर्ग ३ मधील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांची मत्ता व दायित्व यांची विवरणपत्रे शासनाकडे सादर करणे अनिवार्य आहे. अशी प्रमाणपत्रे सादर न करण्या न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद शासनाने २०१४ मधील अधिनियमाद्वारे केली आहे. तरी देखील शासनातील वर्ग १ ते ३ चे काही अधिकारी शासकीय सेवेत भ्रष्टाचार व गैरव्यवहार करून अवैध संपत्ती निर्माण करीत आहेत. याबाबत ठाणे आर.टी.ओ. कार्यालय आघाडीवर असून ठाणे आरटीओ कार्यालयातील अनेक कर्मचारी भ्रष्टाचार व गैरव्यवहारा मार्फत जमा केलेली काळी कमाई दडवित होते या बाबतीत राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी सातत्याने आघाडी उघडल्याने परिवहन आयुक्त कार्यालयाने ठाणे आरटीओ कार्यालयातील ११ कर्मचारी प्रवीण तांडेल, वरिष्ठ लिपिक, सायली कोचरेकर, वरिष्ठ लिपिक, शबाना इनामदार, लिपिक, सचिन तायडे, लिपिक, संतोष समेळ, लिपिक, विकास परबत, लिपिक, बळीराम कांबळे, वरिष्ठ लिपिक, मनीष जाधव, कनिष्ठ लिपिक, किशोर आंबेकर कनिष्ठ लिपिक, धनंजय मुकणे, कनिष्ठ लिपिक अशा ११ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत सुरू असून राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी केल्याने त्यांचे सर्व कौतुक होत आहे.




### आदिवासी कुटुंबियांना गॅस युनिटचे मोफत वाटप

वाडा : तालुक्यातील अबिटघर येथील आदिवासी युवा संघटना व रमेश मित्र मंडळ साठेपाडा यांच्या विशेष प्रयत्नाने व पाठपुराव्याने आदिवासी कुटुंबियांना गॅस युनिटचे मोफत वाटप करण्यात आले. वन विभाग जव्हार, वनपरिक्षेत्र पश्चिम वाडा, परिमंडळ नेहरोली व संयुक्त वनव्यवस्थापन समिती आबिटघर यांच्या मार्फत आज बुधवारी (दि.११) साठेपाडा येथे मोफत गॅसचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमात वन विभागालगत असलेल्या आदिवासी कुटुंबियांना गॅस युनिटचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी वन अधिकारी धुरी, वन संरक्षक घोडविंदे, बांगर मॅडम, वन व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्रीपत पाटील, माजी सरपंच भागवत साठे, जेष्ठ नागरिक शांताराम धनगरे व भारत गॅसचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदिवासी युवा संघटना राज्य प्रवक्ते संतोष विष्णू साठे यांच्या सोबत रमेश मित्र मंडळ साठेपाडा यांच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

### मारहाणीत चोरट्याचा मृत्यू; तिघेजण अटक

भिवंडी : भिवंडी शहरातील बालाजी नगर परिसरात चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरट्याला नागरीकांनी पकडून बेदम मारहाण केल्याने त्याचा जखमी अवस्थेत उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. अजय वर्मा (वय २९), अश्रफ खान (वय २४), सूरज वर्मा (वय २७) असे चोरट्याच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तर समसुद्दीन मोहम्मद शेख (वय २६ रा. लाहोटी कंपाउंड) असे मृत चोरट्याचे नाव आहे. मृत व्यक्तीवर चोरी व घरफोडी सारखे चार गुन्हे पोलीस ठाण्यात दाखल आहेत. भिवंडी शहरातील नारपोली बालाजीनगर परिसरामध्ये असलेल्या एका खानावळीत पहाटे दोन चोरटे चोरीच्या उद्देशाने गेले. एक चोरटा खानावळीच्या बाहेर दुचाकीवर उभा राहिला व दुसरा खानावळीचे शटर उचकटून आत शिरला होता व येथील कामगाराचे मोबाईल तसेच बॅग घेऊन जात असताना शटरचा आवाज आल्याने खानावळीमध्ये झोपलेल्या कामगारांनी चोराला बाहेर निघत असताना पाहिले व आरडाओरडा करून कामगारांना तसेच मालकाला उठवून चोराला पकडले व त्याला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

### जि.प. महिला सदस्याचा उपोषणाचा इशारा

भिवंडी : ग्राम पंचयातीस कर्ज देण्यास जिल्हा परिषदेचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत जिल्हा परिषद प्रशासना विरोधात सोमवारी उपोषण करत असल्याचा इशारा जिल्हा परिषदेच्या सदस्या श्रेया श्रीकांत गायकर यांनी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. श्रेया गायकर या भिवंडीतील पडघा जिल्हा परिषद गटातील जिल्हा परिषदेच्या विद्यमान सदस्या असून त्यांच्या मतदार संघात असलेल्या कुरुंद ग्राम पंचायतीत विकास कामांसाठी ग्राम पंचायतीने भिवंडी पंचायत समितीकडे एक कोटी रुपये कर्जाची मागणी केली आहे. पंचायत समिती मार्फत सदरचा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी ठाणे जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला आहे. या कर्जा संदर्भात ६ जुलै २०२० रोजी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देखील मिळाली आहे. मात्र तरी देखील जिल्हा परिषद प्रशासन कुरुंद ग्राम पंचयातीस कर्ज मंजूर करण्यात टाळाटाळ करत असून केवळ राजकीय दाबावापोटी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा व अधिकाऱ्यांकडून ग्राम पंचयातीस कर्ज मिळण्यासाठी टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप गायकर यांनी लेखी निवेदनाद्वारे केला असून ग्राम पंचायतीस कर्ज मिळू न दिल्याने ग्राम पंचायतीच्या विकास कामांना खीळ बसली असून जिल्हा परिषदेच्या दुर्लक्षित कारभाराविरोधात सोमवारी ठाणे जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा जिप सदस्या श्रेया गायकर यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

# सोलापूरमध्ये अवैधरित्या चालणाऱ्या गॅस अड्ड्यावर छापा

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर तालुका पोलीस स्टेशन हददीतील मौजे मुळेगाव, ता. दक्षिण सोलापूर गावाच्या शिवारामधील धवलनगर येथील अवैधरित्या चालणाऱ्या घरगुती गॅस टाक्यामधुन कमी किमतीने रिक्षामध्ये गॅस भरत असल्याचे गोपनिय माहिती प्राप्त होती. त्या अनुषंगाने मा. तहसिलदार ता. दक्षिण सोलापूर यांच्याकडील पथक व सोलापूर तालुका पोलीस स्टेशन कडील अधिकारी व कर्मचारी असे संयुक्त पणे धवलनगर मुळेगाव ता. दक्षिण सोलापूर येथे छापा टाकुन कारवाई करण्यात आली असुन मुख्य आरोपी १) नागेश बाबु साखरे रा. धवलनगर, मुळेगाव, सोलापूर हा अवैधरित्या घरगुती गॅस विक्री करत असताना मिळुन आल्याने, त्याच्याताब्यातुन घरगुती गॅस टाक्य, इलेक्ट्रीक काटा, इलेक्ट्रीक मोटार असे साहित्य व सदर ठिकाणी अवैषरित्या गॅस रिक्षामध्ये भरत असताना २) गणेष रामचंद्र जाधव, ३) मुनाफ जैनोददीन शेख, ४) किरण तानाजी मोरे ५) शेकांबुर खुदावंत नदाफ, ६) ज्योतीबा प्रकाष शिंदे ७) दशरथ शिवाजी मग्रुमखाने हे त्यांच्या रिक्षासह मिळुन आले, सदर ठिकाणावरून १५,२१,०००/- रू. किमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. मौजे मुळेगाव ता. दक्षिण सोलापूरचे तलाठी. भिमाशंकर रामण्णा भुरले यांनी दिले फिर्यादी वरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास सोलापूर तालुका पोलीस निरीक्षक, सुहास जगताप हे करीत आहेत. सदरची कामगिरी सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, सोलापूर ग्रामीण, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर शिदे सोलापूर विभाग सोलापूर, यांच्या मार्गदर्शना मध्ये सोलापूर तालुका पोलीस ठाणे कडील पोलीस निरीक्षक सुहास जगताप व सपोनि अनिल देवडे, मसपोनि तावरे, सपोफौ/कपडेकर, सपोफौ गायकवाड, मपोह/वैशाली कुंभार, पोना/ राहुल कोरे, मपोना/चवरे, पोकॉ/ शशि कोळेकर, किशोर सलगर, मोहन मोटे, राजु इंगळे, अमृता जाधव, चापोना/ प्रशांत बेलभंडारे यांनी पार पाडली आहे.

# अशासकीय महाविद्यालयीन नांदेड शिक्षकेतर कर्मचारी विभागीय कोषाध्यक्षपदी दतात्रय आळंदकर व कार्याध्यक्षपदी धनराज जोशी



**लातूर/प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ अशासकीय महाविदयालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचे नांदेड विभागाचे विभागीय कोषाध्यक्षपदी दयानंद विधी महाविदयालयाचे दतात्रय आळंदकर यांची निवड करण्यात आली आहे. या संघाची सर्वसाधारण सभा रविवारी दिनांक ८-११-२०२० रोजी श्री.माधव घोडके शाहीर आण्णाभाऊ साठे महाविदयालय ,मुखेड यांच्या अध्यक्षतेखाली कन्हैयालाल जोशी रात्रीचे वाणिज्य महाविदयालय, लातूर येथे खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी कोषाध्यक्षपदी दतात्रय आळंदकर, तर कार्याध्यक्षपदी धनराज जोशी यांची निवड करण्यात आली. यावेळी दयानंद विधी महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ.पूनम नथानी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून उभंयताचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना आळंदकर म्हणाले की, मी संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करीन तसेच सर्व कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणीला, मदतीला धावून जाईन. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.गोपाळ पांचाळ यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक प्रा.उमेश काटेकर, कार्यालयातील कर्मचारी एस.एस.कोकणे, एस.एस. येरटे, एम.एस.बाजपाई, गोपाळ गाडेकर, संदीपान कदम, श्रीमती उषा डोंगरे, कु.सपना बादाडे, शेषेराव बिराजदार, ब्रिजमोहन व्यास इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. या निवडीबददल त्यांचे स्वागत होत आहे.

# अंगणवाडी सेविकांना २ हजार रुपये दिवाळी भाऊबीजेची भेट - ॲड.यशोमती ठाकूर

**मुंबई/प्रतिनिधी**



एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी कर्मचाऱ्यांना यावर्षी भाऊबीज भेट म्हणून दोन हजार रुपये देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. कोरोना काळात लाखो बालके, स्तनदा मातांना घरपोच आहार पोहचवणे तसेच 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' मोहिमेत अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे; त्यामुळे दिवाळीपूर्वीच भाऊबीज भेट देण्यात येत असल्याचे महिला व बाल विकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी सांगितले.

राज्यात ९३ हजार ३४८ अंगणवाडी सेविका, ८८ हजार ३५३ अंगणवाडी मदतनीस व ११ हजार ३४१ मिनी अंगणवाडी सेविकांना प्रत्येकी २ हजार रुपये भाऊबीज भेट देण्यात येणार आहे. यासाठी ३८ कोटी ६१ लाख रुपये निधी वितरित करण्यात येणार आहे. मंत्री ॲड. ठाकूर म्हणाल्या, कोरोनाच्या लॉकडाऊन काळात अभूतपुर्व परिस्थिती निर्माण झाली असताना दुर्गम भागात चालत जाऊन, नावेने नदी पार करत अशा विविध अडचणींवर मात करत अंगणवाडी सेविकांनी घरोघरी पोषण आहार पोहोचविला. स्थलांतरित मजूरांच्या अपत्यांचीही काळजी घेतली. या सगळ्यामुळेच पोषण माह कार्यक्रमात महाराष्ट्राने देशात अव्वल क्रमांक पटकावला. कोविडमुक्त महाराष्ट्रासाठी 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या अभियानातही घरोघरी जाऊन महत्वाची जबाबदारी महिलांनी बजावली आहे. त्यांच्या कामाचा शासनाला अभिमान आहे. त्यांची दिवाळी गोड व्हावी यासाठी दिवाळीपूर्वी भाऊबीज भेट देण्यात येत आहे, असेही मंत्री ॲड. ठाकूर म्हणाल्या.

# भिवंडीच्या नांदकर नदीतून रेती माफियांकडून सक्शन पंपाद्वारे अवैध वाळू उपसा सुरू

## भिवंडी महसूल विभागाकडून कारवाईची अपेक्षा!



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी तहसील अंतर्गत येत असलेल्या नांदकर येथील काळू नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात रेती माफियांकडून अवैध वाळू उपसा सुरू असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. काळू नदीच्या पात्रात नांदकर येथे सक्शन पंपाद्वारे दिवस-रात्र अवैधपणे वाळू उपसा होत असल्याने या विरोधात भूमिपुत्र एकवटले असून अवैध वाळू उपसा तात्काळ थांबविण्यात यावी अशी मागणी नांदकर ग्रामपंचायतीचे उपसरपंच मनोज पाटील यांनी तहसीलदार आदीक पाटील यांच्याकडे केली आहे. राज्यातील नद्या, खाडी तसेच समुद्र किनारे आदी किनाऱ्यांवर सक्शन पंपाद्वारे बेसुमार वाळू उपसा केला गेल्याने नैसर्गिक किनाऱ्यांचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आल्याने राज्य शासनाने नदी, खाडी अथवा समुद्रातून सक्शन पंपाद्वारे रेती उत्खनन करण्यावर बंदी घातली आहे. मात्र असे असताना भिवंडी तहसील अंतर्गत मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत आहे. याकडे भिवंडी महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असून संबंधित अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. काळू नदीवर आंबिवली, नांदकर गावाला जोडणारा एक बंद पूल असून त्याचे खांब पूर्णपणे मोडकळीस आले आहेत या पुलाच्या दोन्ही बाजूला सक्शन पंपाद्वारे अवैध वाळू उपसा करण्यात येत आहे. त्यामुळे हा मोडकळीस आलेला पुल अचानकपणे कोसळू शकतो तसेच या अवैध सक्शन पंपावर काम करणारे गरीब मजूर या दुर्घटनेत मृत्युमुखी पडू शकतात याकरिता येथील गावकऱ्यांनी एकत्र येऊन अवैध वाळू उपसा तात्काळ थांबविण्याची मागणी केली आहे याबाबत ग्रामस्थ ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून सक्शन पंपाद्वारे होत असलेला वाळू उपसा तात्काळ थांबविण्याची विनंती करणार आहेत. या अवैध सक्शन पंपाद्वारे दिवसरात्र वाळू उपसा करणाऱ्यांवर भिवंडी महसूल विभाग काय कारवाई करतात? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.





दिपोत्सव- २०२० निमित्त हार्दिक शुभेच्छा... !
सर्व सामान्यांच्या जिव्हाळ्याची बँक- लातूर बँक

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. लातूर
आर्थिक स्थिती- ३१-०३-२०२० अखेर रू. कोटीत

| | | | |
|---|---|---|---|
| शाखा | १२१+ १ | नक्त मुल्य | ३६१.१३ |
| भाग भांडवल | ९९.७५ | ढोबळ नफा | ४७.३० |
| गुंतवणूक | १६८५.२८ | निव्वळ एनपीए | शुन्य |
| ठेवी | २९०३.१२ | वसुली | ९५.२९% |
| दिलेली कर्जे | १६९७.६५ | ऑडिट वर्ग | अ |

मा. एच. जे. जाधव, कार्यकारी संचालक
मा. पृथवीराज सिरसाट, व्हा. चेअरमन
मा. ॲड. श्रीपतराव काकडे, चेअरमन

संचालक

सहकार महर्षी मा.श्री.दिलीपरावजी देशमुख,मा.आ.श्री बाबासाहेबजी पाटील, मा.आ. श्री.रमेशजी कराड,ॲड.विश्वभंरावजी माने, एस. आर.देशमुख, अशोकरावजी पाटील-निलंगेकर,नाथसिंह देशमुख,भगवानराव पाटील, संभाजी सुळ, एन.आर.पाटील, ॲड. प्रमोद जाधव, व्यंकटराव बिरादार,धर्मपाल देवशेट्टे,सौ शिवकन्याताई पिंगळे, सौ.स्वंयप्रभाताई पाटील,सुधाकर रूकमे,तज्ञ संचालक- यशवंतराव पाटील, संजय बोरा

16 TO 22 NOV 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 13/11/2020 9:04 PM Page 1






























































CMYK